गजब कहाणी [1]

मूळ कादंबरी : जोझे सारामागो

मराठी नाट्य-रूपांतर: प्रदीप वैद्य

दृश्य १

पात्रं १ आणि २. याशिवाय काही युरोपियन वेशभूषेतली माणसं .. ती वेगवेगळ्या भुमिका करत राहातील. त्यांनी एकमेकांशी आणि १ व २ शीही सतत ओळखू न येणाऱ्या भाषेत बोलणं अपेक्षित आहे. सर्वजण झोपलेले आहेत. त्यांच्या काळ्या आकृती रंगमंचभर पसरलेल्या आहेत. एका बाजूला १ दिसत आहे .. आता एकटाच जागा असलेला १, थोडा वेळ झुलून मग बोलू लागेल ..

१ - श्रावणातली रात्र .. पौर्णिमा .. पौणिमेचा चंद्र .. हा असा डोक्यावर आलेला .. इथे प्रथमच असं काही पाहायला मिळतंय .. आपल्याकडे काय हो .. श्रावणात पाऊस .. नाहीतर कमीतकमी ढग तरी नक्कीच .. श्रावणातली पौर्णिमा कशी दिसते तर अशी .. लख्ख चंदेरी प्रकाश .. ही इथली निराळीच झाडं, त्यांचे चमकणारे शेंडे .. इथे अशी सगळीकडे नुसती हिरवळ आहे .. त्या हिरवळीत गवताच्या प्रत्येक पात्याचं टोक हे असं चमचम करत वाऱ्यावर डोलतंय .. अशी हज्जारो चमचम करत डोलणारी टोकं मला इथे दिसताहेत .. आणि त्यांच्यावर हे इथे पडलेले काळे .. दगड ? .. नाही नाही .. माणसं .. पण दगडच .. ढेर झालेली ही सगळी माणसं .. आमचा हा अख्खा ताफा .. तो पलिकडे झोपलेला या तांड्याचा म्होरक्या .. हे सगळे शिपाईगडी .. ती तिकडे दमून मेल्यागत झोपलेली बैलजोडी आणि हा इथे अगदी जवळ पडलाय तो .. शुभ्र .. किंवा शुभ्रो ! हा आणि मी अशी दोघंच या सगळ्यांहून वेगळी .. पार लांबून इथे आलेली .. किंवा आणली गेलेली .. किंवा आणखी दूर नेली जात असलेली .. म्हणजे असं म्हणतात की आपण शेवटी पोहोचतो त्याच ठिकाणी आपण जायचं असतं .. किंवा अपेक्षित असतं .. पण हे असंच आणखी किती चालणार कोणास ठाऊक .. पण राजेशाही काम आहे .. ही यात्रा सुरू झाली त्याला तीन दिवस होऊन गेले .. आजची ही तिसरी रात्र .. तीन रात्री तीन दिवसांपूर्वी हे सगळं सुरू झालं ..

हे सगळं रामायणही सुरू झालं ते एका राणीच्या हट्टामुळेच !

राण्यांचे हट्ट, राजांची अन्तःपुरं आणि राजा आणि राणी यांचे शृंगार, यांचा संबंध धर्मशास्त्र, राज्यशास्त्रांशी असो नसो .. त्यांच्यामुळे .. केवळ त्यांच्यामुळेच, प्रजेच्या दृष्टीने मोठे ठरतील असे बदल होऊ शकतात, त्या बिछान्यांवरच, बेतली जातात अनेक मोठी स्थित्यंतरं जी नंतर सामान्य प्रजा पाहू शकते, हे मात्र नक्की .. आणि म्हणूनच मग दरवेळी, राजकीय बिछान्यांवर घडणाऱ्या या घडामोडींना, क्षुद्र किंवा प्रासंगिक म्हणून बाजूला टाकता येत नाही, इतकं मोठ्ठं काहीतरी, त्यांच्यातून उभं राहातं हे ही नक्की .. तर पोर्तुगाल नांवाच्या, आपल्या दृष्टीनं दूरदेशीच्या भूमीवर, अश्याच एका थंड रात्री, डोना

---

[1] हाकारा। **hākārā** या मराठी व इंग्रजीतून प्रकाशित होणाऱ्या ऑनलाईन नियतकालिकाच्या विसाव्या आवृत्तीत (संचार/Mobility, डिसेंबर २०२३) जोझे सारामागो यांच्या An Elephant's Journey या नाटकाचे मराठी रुपांतर प्रकाशित झाले आहे. मराठी रूपांतराच्या सादरीकरणासाठी प्रदीप वैद्य यांची परवानगी आवश्यक. संपर्कासाठी ईमेल: vaiddya@gmail.com

कात्रिना नांवाच्या राणीच्या गरम डोक्यातून .. डॉमज्यो नावाच्या, पोर्तुगाल भूमीच्या राजाच्या, म्हणजेच तिच्या नवऱ्याच्या कानात तिने केलेली जी धुसफुस होती, त्यातून हे सगळं सुरू झालं.

या कत्रिना राणीला .. आता अगदी झोपायच्या वेळीच .. .. तिच्यासोबत, तेव्हा तिथे असलेला तिचा नवरा .. ज्यो राजा, तो जरा अतीच धार्मिक असल्याने, नेमकं केव्हा, ते सांगत नाही पण .. नेमकं तेव्हाच .. असं लक्षात आलं, की ऑस्ट्रिया देशीचा, तिचा जावई .. मॅकमिलियन याला, त्याच्या लग्नानिमित्त पोर्तुगालच्या या, राजा-राणीनं दिलेलं गिफ्ट, हे फारच फालतू होतं .. त्यामुळे आता .. जेव्हा तो तिचा जावई, मॅकमिलियन, स्पेन देशातल्या एका प्रांताचा, सरदार घोषित केला गेला .. तेंव्हा, त्यानिमित्त काहीतरी भारी भक्कम गिफ्ट देऊन, ही चूक सुधारायची, अनावर इच्छा, त्या कात्रिना राणीला, नेमकी त्या बिछान्यावर .. त्या राजासोबत असताना, नि नेमकं तेव्हाच .. झाली .. म्हणून .. म्हणून .. हे सगळं सुरू झालं ..

राणीनं असा अनावर हट्ट, नेमका अशा विचित्र वेळी केल्यावर, क्षणभर राजाला कळेना की आता या जगात, असं कोणतं गिफ्ट आपण शोधावं .. त्याचा श्वास थांबायची वेळ आली .. त्याच्या अंगावर जो घाम, आधीच थोडा थोडा फुटला होता, तो आता वाहू लागला .. राणीच्या बिछान्यावरच्या, अवाजवी मागण्यांची, आज पहिलीच वेळ नसावी .. त्यामुळे धीर करून त्याने जेव्हा राणीला, काय गिफ्ट असं विचारलं, तेव्हा राणीने तेही ठरवून ठेवलं होतं, हे त्याला कळलं .. आणि तिथून हे सगळं सुरू झालं ..

हे भारी भक्कम गिफ्ट, म्हणजे एक हत्ती .. ज्याचं नाव सॉलोमन असं ठेवून, पार भारत भूमीवरून, तो इथं, पोर्तुगाल देशी आणला गेला होता .. तर पोर्तुगालच्या भूमीवरून, हा हत्ती ऑस्ट्रियाच्या भूमीवर, पायी नेण्याचा जो भारी भक्कम प्लॅन, राणीच्या नादानं, या ज्यो राजानं, केला … त्यामुळे जनतेला, हा हत्ती, असा राजकीय इतमामाने जाताना दिसू लागला .. आणि युरोपच्या जनतेने, पाहिली जी हत्तीची यात्रा, तिथून हे सगळं सुरू झालं ..

सगळं वेगळंच .. माणसं वेगळी .. भाषा वेगळ्या .. जमीन वेगळी .. या हत्तीखेरीज आणखी एकच गोष्ट, या हत्तीला आपलीशी वाटणारी .. ती म्हणजे हत्तीचा माहुत, त्याचं नांव शुभ्र किंवा शुभ्रो .. नावात काय आहे? , असं, इकडलाच कोणीतरी म्हणून गेला म्हणे .. ते खरंच आहे .. हा शुभ्र, शुभ्र नुसता नावाचाच .. या सगळ्यांमधे तो ही झोपला आहे .. तसाच ढेर होऊन .. झोपला आहे, तो इतर सर्वांप्रमाणेच, पण झोपेतच अचानक, त्याच्या पोटात काहीतरी होईपर्यंत .. आणि तसं ते काहीतरी, कळ उठल्यागत झाल्यावर तो उठून बसला आहे ..

दरम्यान २, जो जवळच झोपला होता , तो असा पोटात दुखू लागल्यासारखा अचानक उठून बसतो. मग खूप अस्वस्थपणे इकडे-तिकडे जायचा प्रयत्न करतो .. थोडा पुढे जातो पण त्याला भिती वाटून परत येतो .. मग तो दोन शिपायांना उठवून त्यांना घेऊन जातो .. त्याला खूप घाई झाल्याचं स्पष्ट आहे .. हे सर्व होताना १ बोलतच आहे.

१ : (पुढे बोलत .. ) तर तीन दिवसांचा प्रवास, तो ही खाण्यापिण्यात झालेले प्रचंड बदल सहन करतानाच झालेला .. त्यामुळे पोटाच्या असह्य कळांना, टाळण्याचा एकच रस्ता, त्याला दिसत होता .. म्हणजे रात्र असल्यामुळे, तसा नीट दिसत नव्हता .. पण पोटातलं सगळं काही रिकामं करण्याचा, हा रस्ता एकट्याने पार करता येणं, शक्य दिसत नव्हतं .. कारण चंद्रप्रकाश असला, तरीही मधेमधेच, ढगांमुळे चंद्र झाकलाही जात होता .. नेमक्या अश्याच एका वेळी .. घाईच्या एका उत्कट क्षणाला .. सोबतीची गरज भासून .. दोन

शिपाईगडी .. पोर्तुगाल देशाचं, महान सैन्य, त्या ज्यो राजाच्या अधिकाराखाली, शौर्याच्या कथा निर्माण करत होतं, किंवा नव्हतं .. त्या सैन्यातले दोन शिप्पाईगडी .. त्यांना घेऊन तो जरा उंचवट्यावर असलेल्या, झाडीच्या मधोमध गेला .. पोटात उठलेली कळ .. असह्य कळ .. ती सुद्धा बघा .. रात्री .. अगदी झोपेच्या वेळीच, उठलेली !

आता २ बोलू लागतो ..

> २ : आणि त्या तश्या रात्री .. या दूरदेशीच्या आकाशावर, रात्र सरकून चांगलीच वर आली असताना, आणि त्याचवेळी चंद्रावरती, एक मोठा ढग आला असताना, आणि त्या ढगामुळे, सगळ्या जमिनीवर, काळा रंग चढला असताना .. मी त्या काळ्या सावल्यांसारख्या झाडांखाली, म्हणजे, माझ्या पोटात, बेंबीखाली, जोराची कळ आलेली असताना, आता हा एकच पर्याय उरला, म्हणून जवळच्या एका टेकाडावर चढलेला असताना, आणि बरी जागा बघून, सोबतच्या शिपाईगड्यांकडे पाठ करून, माझी तुमान खाली सरकवून, पोटातली कळ, तिथे खाली, जमिनीवर सरकवत असतानाच, चंद्रावरून तो एक मोठा ढग, बाजूला सरकला, आणि मला जो देखावा समोर दिसला, त्यामुळं, माझ्या तोंडून नकळत बाहेर पडलं " हा ss !" आता त्या दूर देशीच्या शिपाईगड्यांना, माझं नि मला त्यांचं, बोलणं काहीही कळत नसताना .. माझ्याकडं पाठ केलेल्या त्या शिपायांना वाटून गेलं, की, की, माझी कळ थांबल्याचाच हा परिणाम .. ते आपले त्यांच्याच नादात गुंतलेले असताना .. आता, मला काय दिसलं, ते त्यांना काय ते सांगायची, नवीनच घाई, माझ्या पदरी आली .. घाईघाईनं, तिथलंच गवत उपटून, मी स्वतःची साफसफाई करायला वापरून, आणि घाईघाईतच, तुमान वर सरकवताना, "ही खाजखुजली तर नसेल" अश्या विचारात पडलेला असताना, त्या शिपायांपाशी आलो, आणि मला जे दिसलं होतं ते त्यांना सांगू लागलो ..

१ : त्यांना काय डोंबल कळणार ? पण घाईघाईत उपटून, पुसायला वापरलेलं ते गवत, खाजखुजली - नसल्यामुळे, स्वतःचं डोकं खाजवून, आणि चालवून, असंख्य खाणाखुणा आणि आरडाओरडा करून, शेवटी त्या शिपायांना जे सांगायचं .. ते त्यानं सांगितलं ..

दरम्यान २ "आरं गाव .. गाव .. वस्ती .. घरं" अश्या खुणा करतो. ते शिपाई आपल्याला न कळणाऱ्या भाषेत अनेक प्रश्न विचारतात आणि काही वेळाने त्या सगळ्यांचं म्हणणं एक होत जातं ... सगळेच गांव आणि घरं पाहून वेडे झाले आहेत ...

१ : त्याच्या झोपेत, राजा-राणीकडून होणाऱ्या सत्काराची स्वप्नं, मस्तपणे पाहात असणारया त्या म्होरक्याला कशाला उठवा, असा विचार करून माहूत शुभ्रो आला स्वत:च्या जागेवर. म्होरक्याच्या घोरण्याच्या सुरांना भेदून, एखादी बातमी सांगण्याची घाई करण्यापेक्षा, झोपायचा विचार करून आडवाही झाला, आडवारून मनाशीच विचार करू लागला ..

२ : देवापेक्षा नशीब, फार भारी ! देवाला खूष करायचं, तर माणसाला पूजा-प्रयास .. उपास-तापास .. नि .. नवस सायास, करावेच लागतात ... आणि ते करूनही तो प्रसन्न होण्याची काही हमी नाही, पण नशीब

म्हणजे कमाल असतं, ते खूष झालं, की या वेड्यावाकड्या रेघांवर, काय झट्कन लिहून टाकेल, काही सांगता येत नाही … असं म्हणत स्वत:च्या हातावरच्या रेघांकडे बघत …

१ : स्वत:च्या हाताकडे बघत शुभ्रो झोपी गेला, पण केव्हा आपल्याला झोप लागली, ते त्याला कळलंही नाही .. म्होरक्याला, आपल्याला दिसलेल्या गावाबद्दल सांगायचा, मनसुबाही, शुभ्रोसोबत झोपीच गेला .. पण म्हणतात ना, माणसाच्या स्वभावाचं काही खरं नाही, माणसाच्या स्वभावाला, औषध नाही आणि सैनिकांच्याही स्वभावाचंही, काही वेगळं नाही .. त्या दोन शिपायांनी, शुभ्रोला सोबत म्हणून गेले असताना ज्यांना ही बातमी आधीच कळली होती त्या शिपायांनी, या कानाचं त्या कानाला करत, कर्णोपकर्णी ही वार्ता, संपूर्ण जथ्याला दिली होती आणि तेव्हाच उगवतीने पिवळट तांबडी होत, सूर्याला त्याच्या नशीबामधे असलेली त्याच्या रोजच्या उगवण्याची, गोलसर रेषा, दाखवून दिली, आणि म्होरक्या ..

३ : म्होरक्या झोपेतच उजव्या कुशीवर झाला, मग लगेच डाव्या कुशीवर झाला आणि मग उठून बसला. पोर्तुगालच्या राजाच्या घोडदळाचा प्रमुख असलेला हा म्होरक्या .. हत्तीच्या या सवारीचा म्होरक्या बनला होता .. याची कारणं दोन .. एक तर राजाचा त्याच्यावरचा विश्वास आणि दुसरं म्हणजे आजपर्यंत अनेक कामं चपळाईने करण्यात हा घोडदळप्रमुख तत्पर म्हणून राजाचा त्याच्यावर असलेला हा विश्वास आणखी वाढला होता तो साधारण तीन-चारच दिवसात जणू काही घोड्यावरच रात्रीचा दिवस आणि प्रसंगी दिवसाची रात्रही करत तो विएन्नाच्या त्या राजाचं उत्तर मिळवून परत आला होता नि त्याच्यामुळेच तर ही राष्ट्रीय महत्वाची मोहीम सुरू होऊ शकली होती .. पण घोडा उडवत सतत फिरणाऱ्या या म्होरक्यालाही तीन दिवसांचा शीण अनावर झाला होता .. अहो आपल्या ढुंगणाखाली कितीही जोरदार घोडे असून काय होणार? हत्तीला घेऊन जायचं म्हणजे त्याच्याच वेगाने चालावं लागणार ना ?

१ : आणि मुळातच हळू चालणारा हत्ती आणखीच हळू चालण्याचं खापर फुटत होतं ते बैलगाडीवाल्यावर .. शुभ्रो बैलगाडीवाल्यावर चढणार आणि बैलगाडीवाला त्याच्या थकलेल्या बैलांवर .. ह्या भांडणाला तो विटलाही होताच .. आता ही कटकट मिटवण्याची संधीच समोर येऊन उभी होती ..

२ : आणि मग सकाळच्या विधींमधे फार वेळ न घालवता, त्या सकाळच्या उजेडात, म्होरक्या, शुभ्रो आणि बैलगाडीचा तिसरा बैल म्हणजे गाडीवान, असे निघालो त्या गावात जायला .. आमच्या बैलगाडीला, मरतुकड्या झालेल्या आमच्या बैलांच्या जागी, नवीन दमाची जोडी, गांवात नक्कीच मिळेल, अश्या आशेने, भरलेले आमचे डोळे, त्या गावात येऊन पाहतात तो काय, ते एक उजाडलेलं गाव होतं, जुनी पडकी घरं, माती-ढेकळांचे ढिगारे, पडक्या भिंती .. नुसतं असं सगळं .. आमच्या मरतुकड्या बैलांइतकीच अवकळा आलेलं ..

३ : एका म्हाताऱ्या शेतकरी बाबाने, पाठीवरचा औत सांभाळत, सांगितलं की गावाचा मुख्य, पलिकडच्या राजवाड्यात राहातो .. आता बैलजोडी वगैरे मिळवायची तर असंच कोणीतरी हवं आणि ते तरी या गावात आहे, म्हणून खूश होत, आम्ही राजवाडा, म्हणून जे पाहिलं, ते तर साधं, एकाच माडीचं घर, ज्याला हा तर म्हणत होता राजवाडा .. त्याच्याकडे आमचे चेहरे वळताच, "तुमच्या लिस्बनच्या थोतरीत मारेल, इतकी संपत्ती भरलेली आहे त्या वाड्यात" असं तो औतवाला म्हातारा बाबा म्हणाला आणि आपल्या वाटेने निघून गेला …

२ : वाड्याच्या जुनाट दारांवर शोभणारी असते, किंवा असायला हवी, अशी वरची भलीमोठी गंजकी कडी मी वाजवली, आणि करकरत ते दार झालं किलकिलं, आणि त्याच्या मागून, एक भलं मोठं नाक, त्या दोन बोट फटीतून डोकावलं, आणि त्याच्या खाली दोन बाजूंनी, भरघोस वाढून, हनुवटीला दोन्ही बाजूनी चिमट्यात पकडणारी मिशी … एव्हढंच काय ते आत दिसू लागलं ..

३ :  "काय आहे ?" असं बोलायला उघडलेले त्याचे जाड ओठ, असे घट्ट बंद झाले, ते परत उघडणारच नाहीत की काय असेच बंद ! मग म्होरक्याने काही सांगण्याच्या आतच गाडीवान बोलता झाला .. आमच्या मरतुकड्या बैलजोडीबद्दल, आणि आमच्या गरजेबद्दल तो बरंच काही बोलला .. पण फटीआडच्या त्या चेहऱ्या वरच्या, मिशीतल्या एका केसाएवढी रेघही, त्या चेहऱ्या वर हलायला तयार नव्हती ..

२ :  मग म्होरक्याला, त्या दाराबाहेर वाढत चाललेल्या उन्हाप्रमाणे, त्याच्या मनात जाणवलेली, अपमानाची जाणीव लपवण्यासाठी, एकावर एक, काव्यात्म शब्दांची योजना करत, बोलावं लागलं .. पण समोरच्या चेहऱ्या वर काहीही बदल दिसेना, काहीही हलताना दिसेना ..

३ :  मग नाईलाजाने, आम्ही पोर्तुगालच्या राजाच्या, एका अतिशय महत्त्वाच्या आणि मोठ्या कामासाठी चाललो आहोत आणि आम्हाला पडलेली अडचण ही राजाची आणि पऱ्या याने राष्ट्राची अडचण आहे आणि त्यामुळे आम्हाला मदत ही राष्ट्राला मदतच आहे, अश्या राष्ट्राबद्दल प्रेमाबिमाच्या भावनांना हात घालण्याचा प्रयत्न ही झाला पण ती दाराची फट, त्यामागच्या त्या मिशीचा तो हनुवटीभोवतीचा चिमटा, आणि त्यातले ते घट्ट निग्रही ओठ आणि तो ढिम्मपणा तस्साच !

२ :  एका सामान्य गढीच्या, दारामागच्या, या नाकाच्या, आपल्याला, आतही येऊ न देण्याच्या, उर्मटपणामुळे, आपलं नाक कापलं जाणार, या विचारात म्होरक्या असतानाच .. ती येडी माणसं काहीबाही बोलत असतानाच, काहीतरी राहून जातय असं मला वाटत असतानाच .. आता इथं राहून राहून दोन वर्षात सगळं नाही तरी थोडं फार जमतं आपल्याला .. त्यामुळे त्यांचं ते ऐकताना, एक शब्द कोणाच्याच बोलण्यात आला नव्हता हे माझ्या लक्षात आलं आणि मी मधेच बोलून गेलो .. हत्ती .. आणि मी बोलून गेलो .. हत्ती !

३ :  आम्ही एक हत्ती नेत आहोत .. हे वाक्य आपल्याला जमणारया मोडक्या तोडक्या भाषेत तो माहूत शुभ्रो बोलू लागला .. मी शुभ्रोच्या पचकण्यावर चिडूनच ते वाक्य पूर्ण केलं

२ :  पण काय आश्चर्य ! एखादी कळ दाबल्यावर, परिकथेतला एखादा दरवाजा उघडावा, किंवा एखादी गुहा उघडावी तश्या प्रकारे, हत्ती या शब्दासोबत, त्या मिशांच्या बेड्या तोडून, ते राठ ओठ उघडले, हसले, विस्फारले .. त्या चेहऱ्या वर एखाद्या लहान मुलाचं कुतुहल, आणि हसू आलं .. कपाळावर घाम आला, आणि काहीतरी दिव्य ऐकल्याप्रमाणे झालेल्या, त्या अवघड चेहऱ्या च्या, अवजड देहाने, ते किलकिलं दार, सताड उघडलं .. आणि ओरडला .. हत्ती ? या एका शब्दाने, आमच्या समोर, एका प्रचंड, अगडबंब देहामधे एक लहान मुलगाच आणून ठेवला होता .. खरंच, नशीब प्रसन्न होतं, तेव्हा देवालाही मागे टाकेल, असं सगळं, आपल्याला देऊनच टाकतं. खरी कळ, आता दाबली गेली होती, नशीबाच्या प्रसन्नतेची .. हत्ती मुळे सगळीच दारं उघडली होती .. दुसऱ्या क्षणाला, आम्ही सगळे, त्यांच्या गोठ्यात होतो .. तिथल्या पांच-सहा बैलांपैकी, अतिशय पारख केल्याप्रमाणे, अधिकारवाणीने, "हा आणि हा" असे दोन बैल निवडले ..

३ :  आता तो चेहरा, जो इतका वेळ, आम्हाला अपमानित करत होता, जो एखाद्या, गढीच्या मालकाच्या, वरताण वागत होता, तो त्या गढीच्या मालकाचा, एक साधा नोकर असल्याचं, त्याने कबूल तर केलंच, पण गांवाबाहेरच, बऱ्या चदा असणाऱ्या , त्याच्या त्या मालकासाठी तो आता काम करत नसून, जणू काही या गढीतही, आमचीच सेवा करायला त्याला ठेवला आहे, असा वागू लागला होता … आम्हाला एक नव्या दमाची बैलजोडी मिळाल्याबरोब्बर, आमचा गाडीवान निघाला पुन्हा जथ्याकडे .. बैल मिळाले, ते गाडीला जुंपायचे, हे ठरल्यावर ते बैल, आपलेच समजून .. त्यांना हाकत हाकत .. तो आणि बैल, यांना या जगाबाहेरच्या कोणत्यातरी नियमांनीच चालावं लागत असल्याप्रमाणे, अतिसंथ लयीत, ते निघाले .. दरम्यान, देवाणघेवाणीची कागदपत्रं, तयार केली गेली .. आणि निघालो आम्ही परत..

२ :  चार पावलं गेलो नसू, तेव्हा मागून कोणीतरी, ओरडत होतं .. आम्ही कोण, काय असं पाहिलं तर .. तो राठ ओठांचा, आकडीबाज, मिशाळजी त्या गढीतमधला "आमचा झालेला" नोकर, त्या गढीच्या दाराबाहेर येऊन, ओरडत होता .. "थांबा थांबा .. कुठे आहे हत्ती .. हत्ती दिसत का नाहियेे कुठे?" म्होरक्याने, मग त्याला लांबच्या त्या उंचवट्यावरची झाडं दाखवली .. "त्या झाडांपलिकडे आहे .. " असं म्हणाला आणि आमचा कार्यभाग संपलेला असल्याने, आता फार वेळ न दवडता, पुढच्या प्रवासाचे वेध लागलेल्या, मनाला लगाम ना लावता आल्याप्रमाणे, आपला घोडा त्याने फेकला. मी ही त्याच्या मागे तसाच निघालो .. दरम्यान .. आमचा जथ्था निघायच्या जय्यत तय्यारीत होता .. सगळं काही गुंडाळून तयार ! मी सॉलोमनला नमस्कार केला आणि त्यानेही मग हलका आवाज करत मला खांद्यावर येऊ दिलं .. म्होरक्या म्हणाला

३ :  नमस्कार काय करतोस ? तो काय देव आहे का तुझा ?

२ :  तर मी म्हणालोच .. "तो देव असतोच आमचा .. पाहिलास नाहीस का चमत्कार ?" म्होरक्या म्हणाला,

३ :  काय ?  हत्ती ?  तुमचा देव असतो?

१ :  बैलगाडीचे बैल, खूप आधीच निघाले असल्याने, आतापर्यंत जोडलेही गेले होते .. म्होरक्या आला आणि त्यानेही लगेचच निघायचा आदेश दिला ..तोच .. काल रात्री .. रात्रीच्या त्या वेदनामय अंधारात, शुभ्रोला आशेचा किरण दाखवणाऱ्या , त्या झाडीच्या पलिकडून, धुळीचे लोट उठू लागले आणि कोणीतरी, जोरात ओरडल्याचे आवाजही येऊ लागले .. आवाज आणि धुळीचे लोट, जवळ जवळ येत गेले, तसं त्या धुळीच्या ढगाच्या मध्यावर, आम्ही पाहिलं, एक फेफरं यायला टेकलेलं खेचर .. आणि त्यावर एक अजस्त्र देह !

२ :  त्या अजस्त्र देहाच्या भाराने, ते खेचर आता मरायला टेकलं होतं .. त्या गढीच्या बाहेर, आम्ही निघालो तेव्हाचं .. चरत असलेलं हे खेचर पकडून, त्यावरच स्वार होत, तो आकडेबाज मिश्यांचा "आमचा" नोकर, कपडे बदलून, आमच्यामागे, तिथे आला होता .. तो उडी मारून उतरताच, जन्माचं ओझं वाहून हलकं झाल्यागत, ते खेचर मटकन खाली बसलं .. आणि .. त्या अजस्त्र देहाच्या नोकराला, जे पाहायचं होतं, ते समोर दिसलं होतं आणि ते पाहून, त्याचा जो आ वासला गेला होता .. तो त्याची अख्खी गढी सामावून घेणाराच ठरला असता .. आम्ही निघालो .. मी अधून मधून वळून मागे पाहात होतो ..

३ :  मी ही मागे वळून पाहात होतो .. कितीतरी वेळ, म्हणजे निदान आम्ही त्याच्या नजरेच्या टप्प्याआड होईपर्यंत तरी, मृतप्राय झालेल्या खेचराच्या बाजूलाच, तो आडदांड देह, त्याच्या त्या विस्फारलेल्या मिश्यांच्या, आ वासलेल्या तोंडासह आणि बाहेर पडलेल्या डोळ्यांसह, जागीच, तिथेच, तसाच, पुतळ्यासारखा उभा होता ..

१ :  अहो काहीही झालं आणि तुम्ही कोणीही असलात आणि कितीही मोठे असलात .. मानाने किंवा देहाने मोठे .. तरी या भागात इतका मोठा हत्ती .. असा सदेह .. असा समोर .. काय रोज रोज दिसतो ?

(हळू हळू अंधार)

दृश्य २

१ :  तिकडे पोर्तुगल मधे कात्रिना राणीने स्वतःला अन्तःपुरात कोंडून घेतलं होतं .. खरंतर ही हत्तीची यात्रा तिच्याच डोक्यातून निघाली होती .. ज्या पलंगावर राजाच्या मिठीत असताना तिने ही कल्पना बोलून

दाखवली होती त्याच पलंगावर आता ती दुःखाचे उमाळे देत पडली होती .. कमीतकमी .. असंच दरबारातल्या सर्वांना वाटत तरी राहील अशी व्यवस्था, हत्तीची यात्रा सुरू होताच, धावत जाऊन, आपल्याला झालेल्या दुःखाशी सुसंगत, अश्या उत्कट शैलीत "मला आता मी स्वतःहून विचारेपर्यंत कोणीही सॉलोमन हत्तीबद्दल काहीही सांगायला येऊ नका"असं किंचाळत, तिच्या त्याच पलंगावर शरीर झोकून देताना, तिने केली होती. या अश्या दुःखातिरेकाची गंमत अशी की हत्ती हेच भारी गिफ्ट कसं ठरू शकेल हे पटवताना तिने हत्तीबद्दल केलेल्या अनेक विधानांचा तिला सोयिस्कर विसर पडला होता. म्हणजे "हे इतकं अगडबंब जनावर .. इथे असं नुसतं उभं आहे दोन वर्षं .. काय उपयोग त्याचा ? खायला काळ नि भुईला भार .. तिकडे इंडिया मधे त्याला लाकडांचे ओंडके वाहून नेणं तरी नशीबी होतं .. इथे नुसतं हे असं उभं राहायचं आणि झुलायचं .. आपल्या जहाजांवरचं अवजड सामान उतरवायला पाठवावं म्हटलं तर ते जमणार आहे का त्याला ?" हे तिचे उद्गार .. तेव्हाचे .. इतर कोणीही आपल्याबद्दल काढले तर अपमानस्पद वाटतील असे तेव्हाचे तिचे उद्गार ती चक्क विसरली असावी असंच ती वागत होती .. माणसाला अनेकदा असं वाटत राहातं की आपण प्रायश्चित्त किंवा तत्सम काही केलं की आपलं मन स्वच्छ होतं .. पण स्वतःच्याच विरोधात सतत काही ना काही करत राहिल्यामुळे आणि त्याचा नंतर सोयिस्कर विसर पडत गेल्यामुळेच तर कात्रिनासारख्यांना दर आठवड्याला चर्चमधे कन्फेशन बॉक्समधे उभं राहून पुण्य नावांच्या अदृश्य वस्तूने आंघोळ करून यावं लागत असावं .. असो .. तिचा शोक तिकडे चालू होता आणि आमची यात्रा इकडे .. हत्ती जागा आणि इतर सगळे ढेर अश्याच बऱ्याच रात्री .. आज मात्र शुभ्रो आणि म्होरक्या जागे आहेत .. शुभ्रो आणि म्होरक्या एकाच शेकोटीपाशी एकाच अग्नीचा शेक घेत एकाच विषयावर बोलताहेत .. आणि त्यांच्या विषयामुळे जागे होत अजून काहीजण तिथे झोपेतून उठून येत चालले आहेत हे दृष्य आज मी प्रथमच पाहिलं या यात्रेत ..

आता ते सगळे दिसू लागतात. त्यांचे युनिफॉर्म बाजूला वाळत घातलेले .. सगळे आतल्या कमीतकमी कपड्यांमधे झोपले आहेत. आता पुढे होणाऱ्या बोलाचालीमधे शुभ्रो आणि म्होरक्यामधलं बोलणं पुढे पुढे म्होरक्या इतर बाजूला जमलेल्यांना त्यांच्या भाषेत सांगतो आणि गोंधळ वाढत जातो तसे आणखी आणखी अर्धनग्न शिपाई तिथे जमा होतात.

३ : असा अचानक पाऊस येतो आणि गोंधळ करतो. सगळ्यांचे युनिफॉर्म आता खराब झालेत .. त्यात ही थंडी .. कसे कुडकुडत झोपलेत बघ ..

२ : माझ्याकरता एका छत्रीची सोय करा आता .. नाहीतर एव्हढ्या मोठ्या राजाची ही मोहीम .. आणि ..

३ : हां हां .. करू .. करू .. नवे .. नव्या दमाचे बैल मिळवले ना ?

२ : (जरा गुश्यातच) हां .. मिळवले ..

३ : व्हिएनामधे काय करणार तू ? आं ?

२ : ?

३ : काय करणार ? तू नि हा हत्ती ?

२ :  काय करणार ? लिस्बन मधे जे केलं ते .. इथे आणले गेलो तेव्हा केलं ते .. तेच ..

३ :  तेच ना ? काय तेच ?

२ :  (वळून शांतपणे) काय आहे .. आपण तिकडे पोहोचलो की हत्ती हत्ती म्हणून एकच गलका होईल .. सगळेजण आपल्यामागे धावतील .. पुन्हा-पुन्हा पाहायला येतील .. रात्रंदिवस हीच चर्चा ..हत्ती हत्ती हत्ती हत्ती .. उत्सव नुसता .. गलका .. गडबड .. जयजयकार ! आणि मग काही दिवसातच सगळे हे सगळं विसरून जातील .. आपापल्या कामाला लागतील .. आणि आयुष्य पुढे चालू राहील त्यांचं .. आमचं .. आपलं .. आयुष्य चालू राहतंच .. एखादी यात्रा थांबली तरी .. आपल्याला आपल्या जयजयकारात हरवून टाकत नाहीतर त्याच लोकांना पडणाऱ्या आपल्या विस्मरणात दडपून टाकत नेत असतं आपल्याला आपलं आयुष्य पुढे पुढे .. माणूस काय आणि हत्ती काय .. नियम काही वेगळे थोडेच आहेत ? मी एक लांबच्या देशातला माणूस इथे आलोय .. तसाच तोही .. आयुष्याच्या नियमांमधून एकच हत्ती आजवर सटकू शकलाय ..

३ :  कोण ? सॉलोमन ?

२ :  छ्या .. गणेश ! आमचा देव आहे ..

३ :  पण मग तू सॉलोमन ला का बरं नमस्कार करत होतास ? तो तर देव नाहिये ना .. कोण तो ?
२ :  गणेश ..

३ :  हं तो देव आहे ना तुमचा ?

२ : हे बघ .. ते तुला कळणार नाही .. देव तो असला तरी याला नमस्कार हा त्यालाच पोहोचू शकतो .. असं काही काही असतं आमच्या धर्मात .. अश्या खूप किचकट गोष्टी आहेत आमच्या धर्मात ..

३ :  हिन्दू ? हिन्दू धर्म ना तुझा ?

२ :  आणि तुझा ख्रिश्चन .. बरोबर ना ?

३ :  हां .. असं म्हणू शकतोस तू ..

२ :  म्हणजे .. म्हणू शकतोस म्हणजे ? आता मी हिंदू म्हणून माझी मुंज झाली .. अगदी लहानपणी .. पण त्यानंतर मी संध्या केली नाही, जानवं घातलं नाही ..

३ :  म्हणजे तू तुझा धर्म पाळत नाहीस ?

१ :  आणि मग त्या चटचट वाजणाऱ्या शेकोटीपुढे एक चर्चा सुरू झाली .. जिच्यात एकापाठोपाठ एकजण सहभागी होत गेले .. तुमचे देव किती, आमचे देव किती .. देव म्हणजे काय .. सैतान म्हणजे काय वगैरे ..

मग शुभ्रोने तिथे जमलेल्या सगळ्यांना गणेशजन्माची प्रसिद्ध कथा सांगून घेतली .. आणि म्हणून त्याने हत्तीला केलेला नमस्कार कसा काय बरोबर धरायचा या प्रश्नात त्यातल्या काहींना गुरफटून टाकलं .. एकंदरीतच रात्रीची ही वेळ ही अश्या चर्चांसाठी किती उपयुक्त असते ! नाही ?

३ :  नाही नाही नाही .. पण म्हणजे तीनच देव आहेत ना ? मग हत्ती हा देव कुठून आला ? हत्तीच ना ? नाही नाही .. हां गणेश ?

२ :  तो शिवाचा मुलगा ..

३ : पण म्हणजे चार देव झाले ना ? एका देवाला विसरतोस कसा काय ?

२ :  ते मी एकटा आत्ता विसरलो .. तुम्ही तर सगळेच तुमच्या एका देवतेला विसरता .. त्याचं काय ?

३ : कोण ? द फादर, द सन आणि द होली घोस्ट .. आणि कोण ?

२ :  व्हर्जिन ? तिचं काय ? तिला सोडलीत की तुम्ही उघड्यावर ..

म्होरक्या तो काय म्हणतोय हे इतरांना सांगताच एकच गलका होतो ..

२ :  (आणखी चेव येऊन) आता आमच्या गणेशाला जन्म देणारी पार्वती पाहा .. आम्ही तिला नाही विसरलो .. ती ही आमच्या देवांमधे आहे ..

म्होरक्या हे ही इतरांना सांगतो .. त्यातला एक जण तावातावाने काहीतरी खूप बोलतो ..

३ :  म्हणजे तुमचे नक्की किती देव आहेत ? आत्ताच्या आत्ता तू तीनाचे चार, आणि लगेच चाराचे पाच देव काय करतोस?

२ :  तसे तर आमचे लाख्खो देव आहेत .. सिंहाची, डुकराची, प्राण्यांची तोंडं असलेले, चार हात असलेले, तीन तोंडं असलेले, सहा तोंडं असलेले, गळ्यात नाग घेतलेले, सोबत कुत्री बाळगणारे, नखाळ पंजांचे, मायाळू डोळ्यांचे, आशीर्वादाच्या हातांचे, हातात विविध आयुधं घेतलेले .. लाखो करोडो आहेत .. पण त्या प्रत्येक देवाला आगापिछा-आईबाप आहे नि तो ही आमचा देव आहे .. पण आता जीझसच नसता तर तुमचं काय उरलं असतं आणि त्याच्या आईला तुम्ही विसरता म्हणजे ..

हा आता काय बोलतोय हे म्होरक्याकडून जाणून घेण्याचा आता सगळे खूप निकराचा प्रयत्न करतात आणि ते समजत गेल्यावर चिडत जातात .. म्होरक्या त्यांना मागे रेटत राहातो ..

३ :  ते म्हणतायत की आता हे जे तू बोललास ते मागे घेतलं नाहीस तर त्या गणेशाच्या कथेतल्यासारखी तुझी मुंडी ते छाटतील ..

२ :  ठीक आहे बाबा .. मी काय ? माफी मागतो .. मागे घेतो माझा प्रश्न ..

म्होरक्या सगळ्यांना शांत करतो .. यापुढे शुभ्रो जे बोलू लागतो ते म्होरक्या नीट ऐकतो .. इतरजण अर्थ विचारतात पण तो त्यांना दाद देत नाही .. ते हळू हळू कंटाळून झोपू लागतात ..

२ : पण गणेश काय, व्हर्जिन काय, जीझस काय, विष्णू काय, सगळे नुसते शब्द आहेत असंच वाटतं मला अनेकदा .. एक शब्द मग त्याचा अर्थ स्पष्ट करायला आणखी शब्द .. मग आणखी शब्द .. अश्या शब्दांच्या मायाजालात आपण सगळे गुरफटलेले राहाणार सतत .. म्हणजे एक शब्द स्पष्ट करायला दुसरा शब्द .. शब्दा-शब्दाने शब्द-शब्द स्पष्ट करण्याची धडपड सगळी चालूच राहाणार .. पण या सगळ्या प्रयत्नांनाच एखादा शाप असल्यागत खरा अर्थ नक्की कोणता, काय, त्या शब्दाच्या थेट मागे काय दडलंय ते काही शेवटपर्यंत आपल्यासमोर येणारच नाही .. अर्थहीन आणि अर्थपूर्ण या दोघांची लडबड सतत चालूच राहाणार .. पण नक्की खरं काय आणि खोटं काय हे काही समजणारच नाही .. म्हणजे जीझस काय, व्हर्जिन काय, गणेश काय, शिव काय .. एखादा शब्द म्हणजे काय हे जाणून घ्यायला एक अख्खी कथा सांगितली तरीही .. कितीतरी कथा सांगितल्या, आणखी कितीही शब्द उच्चारले तरी त्या शब्दामागचा खरा अर्थ एका विचित्र अंधाराआड दडलेला .. गुरफटलेला .. गुरगटूनच राहातो ..

१ : बोलता बोलता त्या रात्रीच्या अंधारात गुरगटून सगळेच झोपी गेले .. पण भिंतीना जसे कान असतात तसे कान आकाशालाही असतात हे कोणाच्या कानांनी ऐकलं नसेल तरी खरं आहे .. देव-दानवांच्या त्या शेकोटीपासच्या चर्चांना कान फुटले आणि जिथे आमचा जथ्था उतरला होता त्या गावातल्या काही कानांपर्यंत जाऊन पोहोचले .. त्या कानांभोवती मग गरम शाली आणि कांबळ्या गुंडाळल्या जाऊन काही काळ्या आकृत्या त्यांच्या ठरलेल्या जागी भेटून कोणाच्याही कानावर पडू नये अश्या गुप्ततेत खुसुर्फुसुर करत गावाच्या चर्चच्या दिशेने चालू लागल्या .. चर्चचा मुख्य पाद्री आता झोपला असेल, त्याला आत्ता उठवण्याची जोखीम घेतली तर त्याचे कान लाल होतील या सगळ्याची ती खुसुर्फुसुर असावी .. पण तरीही धीर करून त्या काळ्या आकृत्यांनी पाद्री महाशयांना उठवलंच .. इतक्या रात्री कन्फेशन बॉक्स कडे आज कोणती कुमारी माता आली असावी असा विचार करत, वैतागलेले पाद्री महाशय मग खूपच विचारात पडले .. कारण चर्चकडे सरकत आलेल्या त्या काळ्या आकृत्यांमधल्या शाली आणि चादरींमागच्या कानांमधल्या डोक्यांमधून निघालेले भितीचे विचार त्यांनी नुकतेच ऐकले होते .. चर्चच्या दगडी भिंतीमधे, मेणबत्तीच्या मिणमिणत्या उजेडात, पाद्री महाशय घसा खाकरून म्हणाले .. "मग? त्यात काय आहे ? देव सर्वच प्राण्यांमधे आहे ... "चादरीमागचा त्यातल्यात्यात धीट स्वर म्हणाला .."हो, पण प्राणीच देव कुठे आहेत? .. इथे तर एक हत्ती आहे .. आणि तो देव आहे ..""असं कसं होईल ? मग जर प्राणीच देव बनायला लागले तर सगळ्या जगात देवच देव होतील .." "तसंच होत जाणार आहे असं तिथल्या सगळ्या बोलण्यावरून वाटतंय .." आणखी एक स्वर बोलला .. ह्या सगळ्या डोक्यांमधे आलेले हे धर्मविषयक उत्तम विचार हे एखाद्या उत्तम वाईनमुळेही असू शकतात असा एकीकडे विचार करत पाद्रीमहाशयांनी एक मार्ग काढला .. "उद्या भल्या सकाळी, आपण सगळे जाऊ .. त्या हत्तीकडे पाहायला हवं .. जर हे असं काही विपरित होत असेल .. तर ते थांबवणं हे धर्माचे सेवक म्हणून आपलं परम कर्तव्य आहे .. शेवटी तो एक प्राणीच .. बिच्चाऱ्या त्या प्राण्याला बाप्तिस्मा नाही का काही नाही .. चर्चमधून साधला जाणारा आध्यात्मिक उन्नतीचा रस्ता त्याने पाहिलेलाही नाही .. माझ्या मागे आध्यात्मिक रस्त्यावर एक पाऊल जरी त्याने टाकलं तरी त्याच्या जीवनात ढवळाढवळ करणाऱ्या या सैतानी शक्तींचा नायनाट होईल .. मी सकाळी पवित्र-जल घेऊन येतो .."

२ :  आणि मग सकाळी, या भागात खातात तश्या उकडलेल्या बटाट्यांच्या सूप इतकं दाट धुकं होतं .. त्यातून अचानक काही माणसंच समोर आली .. त्यात सर्वात पुढे पाद्री महाशय नि त्यांची खुर्ची घेऊन एक माणूस .. आणि काही क्षणातच कळलं की त्या धुक्यामुळे आधी कळलं नव्हतं पण जवळपास अख्खं गाव तिथे जमा झालं होतं .. कडेवरच्या पोराटोरांपासून स्वतःचा भार काठीवरही नीट न पेलता येणाऱ्या म्हाताऱ्या-कोताऱ्या पर्यंत सगळे ! विशिष्ट अंतरावर आल्यावर पाद्रीबाबांनी आपला हात दिमाखात वर केला आणि सगळा तांडा क्षणात थांबला .. "कुठय हत्ती ?" पाद्रीबाबांचा गंभीर आवाज बोलला .. म्होरक्यानं हत्तीपाशी जायला माहूताची परवानगी घ्यायला हवी हे सांगताच .. माहूत म्हणजे कोण इथपासून चर्चा झाली ..

३ :  मी काही मदत करू शकतो का आपल्याला असं त्यांना विचारताच, पाद्रीमहाशय हसले, त्यांनी त्यांच्या आजूबाजूच्या काही लोकांकडे पाहात, हसत बोलायला सुरूवात केली .. "हत्ती आहे तो .. प्राणी आहे, दूरच्या प्रवासाला निघाला आहे .. चर्चच्या सेवेचा भाग म्हणून मी हे पवित्र-जल आणि अॅस्पर्जिलम आणले आहे .. मला हत्तीला शुभ, पवित्र आशीर्वाद द्यायचे आहेत." आधीच्या कोणत्याच गावातल्या पाद्र्यांना हे कसं सुचलं नाही हा विचार करत आम्ही त्यांना शुभ्रोकडे घेऊन गेलो ..

१ :  शुभ्रो म्हणाला, "ठीक आहे .. सॉलोमनला आशीर्वाद द्यायचेत तर द्या .. पण जरा दूर रहा .. त्याला त्रास होईल असं वागू नका .." तर पाद्री म्हणाले, "सॉलोमन ? कोण सॉलोमन ? हत्ती ?" या प्रश्नाचं होकारार्थी उत्तर पाद्र्यांना फारच खटकलं .. हत्तीच्या दिशेने सरकत सरकत ते "शुभ्रोकडे पाहात तुच्छतेने म्हणू लागले, "हत्तीला माणसाचं नाव ? काय अडाणीपणा आहे हा ? हत्ती असला म्हणून काय, मोठा असला म्हणून काय, प्राणी हे प्राणीच असतात आणि माणसं ही माणसं .." त्यावर शुभ्रो मिष्किल हसत, खांदे उडवत, "काय माहित?" असं म्हणाला ते ही पाद्र्यांना खटकलं .. पण आपल्या धार्मिक कर्तव्याच्या दिशेने ते येत राहिले ..

२ :  म्होरक्याने एकदा शेवटचं येऊन सांगितलं, "तो हत्ती आहे .. पाहा तो केव्हढा आहे .. होली कॅथलिक चर्चच्या पुस्तकांमधे वर्णन केलेल्या हिंस्र श्वापदांपैकी असावा तसा .. त्याचे ते सुळे, ती सोंड ... वेडं वाकडं वागू नका .. काही झालं तर सगळी जबाबदारी तुमची असेल" पण पाद्रीबाबांना गावात आलेल्या त्या सैतानालाच तर शांत करायचं होतं .. पवित्र करूनच पुढे पाठवायचं होतं .. एखाद्या मांत्रिकाप्रमाणेच बऱ्याचश्या हालचाली करत हातातल्या त्या लोटीतलं पवित्र-जल म्हणून आणलेलं बाथरूममधलं पाणी त्या कांडीने जादूगाराच्या अविर्भावात हत्तीच्या पुढे-मागे-बाजूनी-पोहोचत नसूनही वर, आणि घाबरत, टरकत खाली शिंपडत जाण्याचा एक धम्माल कार्यक्रम त्यांनी आरंभला .. मला तर मजा येत होती .. त्यांचं ते विचित्र शरीर त्यावेळी आणखी कमालीचं विचित्र दिसत चाललं होतं .. आता हळू हळू हत्तीला नव्हे तर पाद्र्यालाच सैतानाने धरलं असावं इतके विचित्र पुटपुटण्याचे आवाज आणि हालचाली बाबा करू लागले .. आणि माझ्या मनात काहीतरी विपरित घडणार अशी घंटी वाजणार इतक्यात ..

३ :  पाद्रीमहाशयांच्या आध्यात्मिक रस्त्यावर नाही तरी त्यांच्या बरोब्बर मागे एक पाऊल सॉलोमनने उमटवलं होतं .. एकक्षणी त्यांच्या त्या तंत्र-मंत्राच्या भरात वाकडे झालेले पाद्रीमहाशय दुसऱ्याच क्षणी उंच वर उडालेले होते .. अॅस्पर्जिलम आणि लोटी आणि त्यातलं पाणी एका बाजूला, दुसरीकडे जमीनीवर आदळलेले पाद्रीमहाशय आणि मधोमध शांतपणे सोंड आणि एक पाय हलवत उभा .. शांत सॉलोमन ..

१ :  त्यापुढे प्रचंड धावपळ झाली .. पाद्रीबाबाला खुर्चीत बसवून घरी नेलं गेलं .. आणि त्यांना हत्तीमधल्या

सैतानाने लाथ मारली असेल तर त्याचा उपाय म्हणून गावातल्या चेटुक-जारण-मारण जाणणाऱ्या बाईला पाचारण करण्यात आलं .. आणि साधी मलमं आणि औषधं आणि मालिश देऊन तिने मृत्यू किंवा पिशाच्चांचा धोका नाही यात.. असं सांगताच .. सगळे गावकरी सुटकेचा निःश्वास टाकत घरी गेले .. काही जण तिच्या सांगण्याप्रमाणे पाद्रीबाबांना अधूनमधून कुशीवर वळवायला मागे थांबले .. सैतानाचा धोका नसला की माणसांना शांतपणे झोपता येतं किंवा उठून चहा पिता येतं ..किंवा काहीही शांतपणे करता येतं ..

२ : भयंकर दाट धुकं .. त्यातच पुढे जात राहायचं ठरलं आणि जथ्था पुढे निघाला .. बरंच अंतर तसेच जात राहिलो आम्ही .. पण सूर्यदेव डोक्यावर चमकून धुक्याचा नायनाट करायला तयारच नव्हते .. पवनदेवही घरी शांत झोपले होते बहुतेक .. त्यामुळे उकडलेल्या बटाट्याच्या कढीतूनच आम्ही चालत राहिलो .. म्होरक्याला दिशा माहित असणं फक्त महत्वाचं होतं .. आम्ही चालायचं होतं आणि तेच आम्ही करत होतो ..

३ : दरम्यान काय करायला कोण जाणे .. पण एक जण मागे राहिला .. जथ्था हत्तीच्या गतीने जातोय .. तो किती पुढे जाऊ शकणार या फाजिल विश्वासामुळे म्हणा किंवा मागे राहाण्याच्या त्याच्या कारणाने फाजिल वेळ खाल्याने म्हणा .. त्याच्या अपेक्षेपेक्षा जास्त वेळ गेला .. आणि तो जेव्हा निघाला तेव्हा धुक्याच्या अधिक गडद होत जाण्याने आणि जवळ दिशादर्शक असं काहीच नसल्याने आणि धुकं अधिकच दाट होत चालल्याने .. हा महाभाग वाट हरवला .. मागे पडला .. या ओसाडीत धुक्यातून आपण कुठे चाललो आहोत हे न समजून, त्याने मारलेल्या हाकांना प्रतिसादच न मिळाल्यामुळे हतबल होऊन, या पांढऱ्या अंधारातून काहीही अचानक समोर आलं तर आपल्याकडे बचावासाठी काहीही नाही .. म्हणजे आपण हे असे धुक्यात अडकणं म्हणजे मरणच .. असा विचार करत तो गळून गेला .. या भागात लांडग्यांचा फार वावर आणि एकटादुकटा माणूस एखाद्या लांडग्याच्या हिंस्र नजरेतून नि दातातून सुटणंच शक्य नाही याची खात्री कितीतरी ऐकीव कथांमधून मनात या धुक्याइतकीच दाट बसलेली ..
१ : हत्तीच्या सोबत चालण्याचा एक फायदा होता .. हे लांडगे ह्या जथ्थ्याकडे दूरूनच पाहून माघारी फिरत .. लांडग्यांनी हत्ती जरी त्यांच्या जन्मापासून पहिला नसला आणि त्याच्याबद्दल काही गोष्टी आईकडून ऐकल्या नसल्या तरी त्यांना एखाद्या नवीन प्राण्याकडे पाहून हा काय करू शकतो याचा अंदाज बांधण्याची उपजत बुद्धी निदान त्या पाद्र्यापेक्षातरी जास्त असावी .. म्हणजेच हरवलेला तो माणूस .. हत्ती बरोबर चलतानाचं संरक्षण गमावून बसलेला त्यामुळे आता दैवावरच हवाला ठेवलेला आणि मटकन खाली बसून रडू लागलेला तो .. अचानक थांबला .. कारण .. त्याने काहीतरी ऐकलं .. सबंध यात्रेमधे एकदाही न उमटलेला, पण यात्रेपूर्वी लिस्बनमधे ऐकलेला हा एक अद्वितीय ध्वनी .. एखादी महाकाय ट्रंपेट आजूबाजूच्या धुक्याला चिरत त्याच्या कानावर पडावी तसा हा ध्वनी .. सॉलोमनच्या चित्कारण्याचा .. ह्या अभाग्याची प्रार्थना ऐकूनच जणू काही त्याला दिशा मिळावी म्हणून काढलेला ? त्याच्या बदल काहीतरी समजूनच सॉलोमन ने त्याला मारलेली ही मदतीची हाक तर नाही?

२ : आम्ही इकडे आहोत .. या दिशेला ये असं सांगितल्यासारखी ती हाक .. तो चित्कार ऐकून तो झप झप पावलं टाकू लागला .. काही पावलं टाकली असतील नसतील तो अजून एक .. मग अजून एक .. आपली दिशा बरोबर आहे .. आणि अंतर कमी कमी होत चाललंय ही दोन्हीही परिमाणं त्याला सॉलोमनच्या त्या लागोपाठच्या चित्कारांमधून मिळत गेली आणि तो जथ्थ्यात येऊन पोहोचला .. हे सगळं तो तिथे येऊन पोहोचला तेव्हा आम्हाला त्यानं सांगितलं .. जन्माचं ऋण असल्यागत तो सॉलोमन कडे धावत गेला. या त्याच्या परत येण्यामुळे जथ्था काही काळ थांबला होता .. तर सॉलोमन शांतपणे झुलत उभा होता .. हरवलेला शिपाई त्याच्या समोर उभा राहून अश्रूंनी डबडबलेल्या डोळ्यांनी बरंच काही बोलला आणि मग

आमचा प्रवास पुन्हा सुरू झाला .. पण एक कोडं सगळ्यांनाच पडलं होतं .. हा महाभाग ज्या तीन चित्कारांबद्दल बोलला .. त्या सॉलोमननं कधी दिल्या ?

१ :  त्या पाद्र्याच्या आध्यात्मिक उन्नतीच्या प्रयोगानंतर, आधी, किंवा या यात्रेत आतापर्यंत सॉलोमन खरंतर एकदाही चित्कारला नव्हता ..

२ :  अगदी गणपतीची शप्पथ ! नव्हता चित्कारला ..

(अंधार)

दृश्य ३

३ :  राजे, राण्या, सरदार, उमराव यांचे निर्णय आणि त्यांची अंमलबजावणी हे एखाद्या हत्तीपेक्षाही मोठे विषय आहेत. भेटी देणं, त्या नेऊन पोहोचवणं, स्वीकारणं या सगळ्यातच एक वेगळाच बडेजाव आणि त्याच सोबत एक पोकळपणा ठासून भरलेला असतो .. डॉम झाओ राजाच्या कत्रिना राणीच्या डोक्यातून निघालेली आणि सेक्रेटरी पेरो च्या कूटनीतीने भरलेल्या डोक्यात शिजलेली ही योजना. अमुक माणसं असतील, ती तमुक कामं करतील .. याबद्दल मेहेनताना त्यांना हा असेल, अमुक गोष्टी हत्तीला पुरवल्या जातील, त्या कोण पुरवेल, न पुरवल्यास काय, कोणते शिपाई हत्तीच्या कोणत्या बाजूला असतील, ते न राहिल्यास काय, म्होरक्या काय करेल, माहूत काय करेल, गाडीवान काय करेल आणि हा प्रत्येकजण काय काय करणार नाही हे ही त्यात लिहिलेलं होतं .. असा एक कागदच तयार केलेला होता .. आणि तोच कागद अनुवादकाच्या मदतीने वाचून मग ऑस्ट्रियन सरदार मॅक्सिमिलियन यांनी पण एक प्रतिकागद तयार करून पाठवला होता .. त्यातही अटी, नियम कलमं अशी एक मोठी यादीच होती. अंमलदार असतो त्याला यात शेवटी हत्ती कुठून कुठे न्यायचा ते तेव्हढं महत्वाचं असतं .. त्याप्रमाणे या तहनाम्याच्या पहिल्या टप्प्यावर आम्ही हत्तीला किंवा हत्ती आम्हाला असेल, घेऊन आलो होतो. राजेशाही डोकं अंमलदार आणि शिपायांप्रमाणे चालत नाही .. त्यामुळे, आम्ही जेव्हढे होतो त्याच्या पांचपट सैन्य आरामात आतमधे राहू शकेल असा किल्ला कासेलो रॉड्रिगो आमच्या समोर असूनही आमची थांबण्याची व्यवस्था किल्ल्याबाहेर मैदानात केली होती .. तिथेच कच्या तंबूत हत्ती उभा केला जाणार होता. कासेलो रॉड्रिगो हा नुकताच आधुनिकिकरण केलेला किल्ला हे आमचं पहिलं हस्तंतरणाचं ठिकाण होतं. पोर्तुगीज माणसांपैकी काहीजण परत पाठवले जाणार होते आणि त्यांची जागा किंवा त्यांच्यापेक्षा जास्त जागा आता इथून पुढे वालादोलिद शहरापर्यंत स्पॅनिश लोक घेणार होते. राजेशाही भेट हस्तांतरणाचा कार्यक्रम असल्याने स्पॅनिश शिपाई नीट वागतीलच, पण जर नाही वागले तर त्यांना जशास तसे प्रत्युत्तर दिले जाईल असं तहनाम्यात लिहिलं होतं ते का होतं तेच कळत नाही .. हे म्हणजे शेकहँडच्या वेळेस चिमटा काढायची तयारी ठेवल्यासारखं नाही का ? पण अश्या अनेक गोष्टींनी तो कागद भरलेला होता .. स्पॅनिश शिपाई युद्धाला आल्याच्या थाटातच आले .. घोडे बेफाट दौडवत .. आणि ते आल्याच्या सूचनाही शहरात "शत्रू आले शत्रू आले" अश्याच पिटल्या गेल्या. आम्ही ही हत्तीची भेट ज्या स्पॅनिश शत्रूंच्या ताब्यात द्यायची होती त्यांनी यायला मात्र बऱ्यापैकी वेळ घेतला आणि त्या वेळात संधी साधून शुभ्रोने आयोजित केला एक छोटा समारंभ, पोर्तुगीज शिपायांपैकी ज्यांच्या नशीबी परत जायचं त्या कागदावर लिहिलं होतं, त्यांनी सॉलोमनचा निरोप घेण्याचा समारंभ. शुभ्रोने जाणाऱ्यांपैकी अर्ध्या माणसांना सरळ रेषेत उभं राहायला सांगितलं आणि उरलेल्या अर्ध्यांना त्यांच्या बरोब्बर मागे ! सरळ ताठ उभं राहून आपला हात ताठ समोर

धरा शुभ्रो म्हणाला .. आता काय होणार याची उत्सुकता सगळ्यांनाच होती .. एखादा सेनाध्यक्ष आपली सेना पाहात आणि सॅल्यूट स्वीकारत पुढे जातो तसं काही हत्ती आता करेल अशी अपेक्षा असताना पाठीवर शुभ्रो बसलेला सॉलोमन हत्ती येऊन त्या रांगेतल्या पहिल्या माणसासमोर, थेट समोर उभा राहिला .. हत्तीच्या मनात काहीतरी चालू आहे हे ओळखता येणं पण ते काय चाललंय हे न ओळखता येणं ही माणूस म्हणून आपली सर्वात मोठी अडचण असते हे तेव्हा तिथल्या प्रत्येकाला त्या क्षणी कळलं असेल .. कारण तो समोर उभा ठाकला की वेडंवाकडं वागता येत नाही, निमुट उभं राहून जे होईल ते बघत आणि सामोरं जात राहावं लागतं .. तर तसंच उभा राहिलेला तो पहिला शिपाई मनातल्या मनात थरथरत असेल, विचारांचं एक भेंडोळं त्याच्या मनात झरझर फिरत सुटलं असेल आणि तेव्हढ्यात सॉलोमनच्या मनात शुभ्रोचाही अंदाज चुकवणारी जी निरोप घेण्याची योजना तयार झाली होती ती त्याने अंमलात आणली. आम्हाला आणि शुभ्रोलाही वाटलं होतं की हत्ती सर्वांसमोर मधोमध उभा राहील आणि पाय झुलवत, मान हलवत त्याची गगनभेदी ट्रंपेट दोन तीन वेळा वाजवेल .. पण हत्तीच्या डोक्यात काहीतरी वेगळं चालू असतं आणि माणसांप्रमाणेच किंवा कधी त्यांच्यापेक्षा भावनिक असं काही तो करत असतो अश्या कथा सॉलोमन मुळेच हत्तींबद्दल आम्ही ऐकून होतो .. तर सॉलोमन पुढे झाला, पहिल्या जोडीसमोर उभा राहिला आणि त्याने आपल्या सोंडेच्या टोकाचा मांसल भाग त्यातल्या एका शिपायाच्या त्याने पुढे धरलेल्या हाताच्या तळवाला मिळवला .. जणू काही शेकहँड करत होता तो .. त्या मांसल भागातली ऊब आणि मऊपणा मुळे ही भेट एखाद्या गळाभेटीइतकी दाट होऊन ज्याला ज्याला सॉलोमन असा भेटला त्याला त्याला आवंढा गिळता येईना इतकी भावनिक होत गेली .. अनेकांना तर अश्रू आवरले नाहीत .. एखाद्या माणसासोबत चार पावलं चालल्यावरही एक प्रकारचा बंध तयार होतोच त्याच्यात नि आपल्यात .. सॉलोमनसोबत नुसते चालत आलेले हे शिपाई .. सॉलोमनला त्यांच्याविषयी इतकं काही विशेष वाटावं हेच या सगळ्यातलं विशेष नाही का ? अश्रूंनी भिजलेल्या बाह्यांचे कपडे तसेच घेऊन पोर्तुगीज शिपाई परतले आणि आमच्यासाठी नवे कपडे घेऊन समोरचे शिपाई आले .. आता प्रवास सुरू होणार होता वालादोलिद शहराच्या दिशेने जिथे मॅक्सिमिलियन आणि त्याची राणी मारिआ हत्ती स्वीकारून त्याच्या सोबत पुढचा प्रवास करणार होते असं या आमच्या कागदावर लिहिलं होतं !

१ : नव्या कपड्यांमधे शुभ्रो विचित्रच दिसत होता .. म्हणजे सणासुदीला किंवा आजोळी जायलाही तो जे कपडे घालत असेल त्यापेक्षा जास्त भरजरी कपडे प्रथमच घातल्यामुळे एक अवघडलेपणही त्यासोबत त्याच्या अंगावर चढलं होतं .. आणि नीट पाहिलं तर तेव्हढंच ते अवघडलेपण नव्हतं .. आण्खी काहीतरी चालूच होतं .. सतत त्याच्या मनात .. रात्र रात्र झोप न लागणारा तो सतत काहीतरी स्वतःशी नि कधी सॉलोमनशीही बोलत होता ..

२ : राजा-महाराजांचं काही सांगता येत नाही .. अक्करमाशीच असतात .. आपला काय विचार करतील, करतील का नाही .. काय सांगावं ? वालादोलिद पर्यंत मीच माहूत आहे हे नक्की .. पण पुढलं काही कोणी सांगत नाही, त्यांना सांगता येत नाही .. भरजरी कपड्यात ही तीन वाव उंचावर बसलेला माणूस किती ताकद्वान असला पाहिजे असा विचार इथले लहान थोर करतात .. पण मी माझ्या गावापासून इथे आणला गेलो आणि पुढे काय करणार, कुठे नेला जाणार हेच मला माहित नाही .. हत्तीच्या पाठीवर बसणं खालून मस्त वाटत असलं तरी सॉलोमन ला जेव्हा डावीकडेच जायचं असतं आणि आपल्याला त्याने उजवीकडे जायला हवं असतं तेव्हा ह्या जागेवर बसण्यातलं खरं काय ते एखाद्याला कळेल .. एक हत्ती असतो आणि तो जेव्हा जंगल सोडून असा लोकांमधे असतो तेव्हा त्याला एक माहूतही असतोच हे जर खरं मानलं तर मग जिथे एक जाईल तिथे दुसरा जायलाच पाहिजे .. पण वालादोलिदमधे जर नवीनच कोणी माहूत म्हणून जबाबदारी घ्यायला तयार ठेवला गेला असेल तर ? मग त्या माणसाच्या हातात सॉलोमनला

द्यायचा ? आणि मग आपलाही निरोप समारंभ ? आपल्याही तळव्याला हत्ती सोंड घासणार, किंवा मग त्याची ट्रंपेट वाजवणार, झुलणार .. की झालं ? संपलं सगळं ? सॉलोमन सांगू शकेल का .. किंवा असं त्याच्या वागण्यातून कोणाला समजेल का की त्याला माहूत बदललेला चालणार नाही आहे ? का सॉलोमन ला चालणार असेल बदलला माहूत तरी ? आणि असं असेल तर ? सॉलोमन मला तुझ्याशी बोलायचंय .. कोणती भाषा वापरू .. हिन्दी, बंगाली .. इथली कुठली तुला कळेल .. ओरडून कळेल ? कानात बोलून कळेल ? तू जागा असताना बोलू का झोपेत तुझ्या कानात बोललो तर तुला ते कळेल असं मी ऐकलंय .. खरंच कळेल का ? यातलं आता काहीही कळेनासं झालं होतं .. कासेलो रॉड्रिगो ते वालादोलिद या अंतरात व्यवस्था चोख होती खरंतर .. इतक्या दिवसांनंतर उत्तम जेवण, उत्तम कपडे आणि रोज नवं अंथरूण ह्यामुळे सुख वाटल्यामुळे शुभ्रो उसासे टाकतो असं जरी वाटलं तरी उसासे एका विचित्र साक्षात्काराचे होते .. आपला जीव जडला आहे त्याच्यावर .. आता सॉलोमनशिवाय आपण राहू शकणार नाही .. सॉलोमनपासून ताटातूट आपल्याला नको असतानाच ती होण्याची शक्यता दैवात मांडून ठेवलेली दिसत आहे आणि नवा माहूत तिथे वालादोलिद मधे तयार आहे की नाही आणि आता पुढे काय होणार हे केवळ दैवाला आणि त्या मॅक्सिमिलियनलाच माहित आहे ..

(अंधार)

दृश्य ४

१ : वालादोलिद ! एखादया महत्वाच्या राष्ट्रीय दिवसानिमित्त असावी तशी सगळी भपकेबाज रोषणाई करून हे शहर हत्तीच्या स्वागताला पताका, निशाणांसोबतच वावड्या आणि अफवांनीही भरून गेलं होतं. कोणी म्हणत होतं की पोर्तुगलमधल्या भयानक रस्त्यावरून चालून चालून ते बिच्चारं जनावर मरायला टेकलंय तर कोणी म्हणत होतं की हत्ती-बित्ती काही नाहीच .. नुसत्या अफवा आहेत .. काहींनी खऱ्या हत्तीच्या स्वागतासाठी त्यांच्या कल्पनेतल्या हत्तीचीच चित्रं रंगवायला सुरूवात केली होती .. आणि ज्या हत्तीसाठी हे सगळं चाललं होतं त्याच्यावर आजवरच्या प्रवासात जमलेली धूळ आपल्याच एका आदेशामुळे धुतली जात असल्याचं ऑस्ट्रियन सरदार मॅक्सिमिलियन आणि त्याची सध्या अतिशय सुंदर दिसत असलेली बायको मारिआ हे दोघं बघत होते. आणि शुभ्रो त्या सरदाराच्या गोऱ्यापान आणि स्वच्छ दाढी करून झालेल्या सफाचट चेहऱ्याकडे पाहात बसला होता .. डॉम झाओ ची लंबेलांब दाढी आणि त्याच्या चेहऱ्याच्या तुलनेत हा सरदार आणि त्याची ती राणी पण .. जास्त उठावदार वाटत होते .. वालादोलिद नंतर आपलं भवितव्य काय याची चिंता मनात धरून बसलेल्या शुभ्रोला शेवटी सरदाराचं आमंत्रण आलं ..
३ : सरदाराने तिथे गेल्या गेल्या हे जाहीर केलं की आता या हत्तीला सॉलोमन नाही तर सुलेमान म्हटलं जाईल .. खरंतर हे त्याने भेट स्वीकृतीच्या पत्रातच पोर्तुगलच्या राजाला कळवलं होतं पण कात्रिना आणि डॉम झोआच्या सॉलोमन या नावावरच्या प्रेमामुळे आणि पोर्तुगलच्या भूमीवरूनच प्रवास चालू असल्यामुळे ऑस्ट्रियन सरदाराचा हा आदेश कोणी पाळला नव्हता ..
१ : सॉलोमनचा आता सुलेमान झाला ..
२ : मग शुभ्रोला त्याचं नाव विचारलं गेलं .. खरंतर शुभ्रो असं सांगताच श श असं चाचरलेला सरदार त्याच्या राजकीय इतमामाला साजेसं तुच्छ हसला आणि म्हणाला ऑस्ट्रिया मधे लोकांना तुझं नाव कळणारच नाही .. म्हणू तर कोणीच शकणार नाही ते .. आपण तुझं नावही बदलूया .. तू आजपासून फ्रिट्झ आहेस .. फ्रिट्झ हे नाव ऑस्ट्रियात खूप लोकांचं आहे .. त्यामुळे कोणीही ते म्हणू शकेल .. तू हज्जारो लाखो फ्रिट्झ्स पैकी एक असशील .. पण तू एकटाच असा फ्रिट्झ असशील जो हत्तीच्या वर बसू शकतो .. त्यामुळे तुझा असा वेगळा मान राहीलच .. पण नाव बदलायचं म्हणजे .. म्हणजे तिकडे इंडियात

मला हे नाव ठेवलं त्याचं काही कारण आहे .. त्यावर सरदार म्हणाला इंडिया तिकडे आहे .. तिकडेच राहाणार आहे .. आपण युरपमधे आहोत आणि ऑस्ट्रियामधे राहाणार आहोत .. आता तुझ्यामधला इंडिया जरा बाजूला ठेव ..

१ : कठीण होतं .. आपल्यातला इंडिया बाजूला ठेवायचा म्हणजे ? हत्ती भरतातला होता .. तो आत्ता जरी या युरपच्या भूमीवरून चालत असला तरी त्याच्या मनात .. त्या डोक्यात जे जे काही होतं ते भारतीय जंगलात तयार झालेलं होतं .. शुभ्रोला काहीही म्हटलं गेलं तरी त्याची आणि हत्तीची अशी जी एक वेगळी भाषा तयार झाली होती तीही भारतीयच होती .. त्याचे एकमेकाला होणारे स्पर्श भारतीयच होते .. भारत बाहेर कसा काढायचा हा प्रश्नच होत .. आणि नाव .. नावाची आपल्याला जी सवय झालेली असते ती मोडणं .. जरी आपण कितीही म्हणालो की नावात काय आहे, किंवा नावं म्हणजे काय, नुसते शब्द तरीही .. लहानपणापासून आपल्याला ज्याची सवय झालेली असते ते नावच आता आपल्यासोबत नाही .. हे जरा विचित्रच होऊन बसलं ..

२ : नाव बदललं तसा शुभ्रोही किंवा आता आदेशानुसार फ्रिट्झ ही बदलला .. शुभ्रो जरासा स्वतंत्र बाण्याचा होता तर फ्रिट्झ आदेशाची अंमलबजावणी करणारा .. शुभ्रोला एखाद्या आदेशावर बोलायचं स्वातंत्र्य होतं नि ते तो घेतही होता फ्रिट्झ मात्र मूग गिळून गप्पपणे आदेश ऐकणारा .. शुभ्रो साठी म्होरक्या हा जवळपास एक मित्रच झाला होता म्होरक्या हा त्याचा वरिष्ट असला तरीही .. पण फ्रिट्झचा वरिष्ट थेट सरदारच असल्याने आणि तो खूपच कडक स्वभावाचा असल्याने, आणि त्याला पाहिजे तसंच सगळं घडवणारा असल्याने त्याच्याशी कोणत्याही पद्धतीने संभाषण न करता फ्रीट्झला त्याचे आदेश पाळणं हा एकच पर्याय होता .. आपल्यासोबत आणलेले कपडे वापरणारा शुभ्रो आणि आता खास भरजरी कपड्यात अवघडलेला फ्रिट्झ असं बरंच काही त्या नावासोबतच बदलून गेलं होतं .. नकळतच ..

३ : मॅक्सिमिलियन अगदीच खास ऑस्ट्रियन होता .. म्हणजे वरवर बोलणं गोड आणि वळसे घेत घेत कार्यभाग साधणारा .. पण व्यक्तिमत्व ठाशीव त्यामुळे त्याच्या कशालाही विरोध करता येणं शक्यच राहात नसे असा .. म्हणजे वालादोलिदपासून पुढला प्रवास सुरू करताना त्याने असं ठरवलं की तो आणि त्याची सुंदर राणी मारिआ हे हत्तीच्या मागेमागे चालणं पसंत करतील. आता अजूनपर्यंत तिच्या नशिबातल्या १६-१७ मुलांपैकी एकही मूल न झाल्यामुळे अजूनही सुंदर दिसत राहिलेल्या मारिआला ही कल्पना रोमँटिक वगैरे वाटली असेल, आणि त्यामुळे ती मांडताना थेट तिची मांडी पिरगळणारा तिच्या नवऱ्याचा हात तिने रोखला नसेल, पण शिपायांपैकी एकाला मात्र एका महत्वाच्या गोष्टीचं भान होतं आणि त्याने आपल्या सरदाराला भानावर आणायचा प्रयत्नही केला .. पण तो व्यर्थ होता .. कारण ऑस्ट्रियन सरदाराचा शब्द म्हणजे आदेश .. आदेश निघाला होता .. शिपायाचं वास्तविक बरोबर होतं ते असं की .. घोडा, बैल आदि प्राण्यांप्रमाणेच हत्ती हा ही प्राणीच असून, अन्न-पाणी आदि पदार्थांच्या पचनाच्या प्रक्रियेची समाप्ती करणारे विसर्जन विधी, हत्तीदेखील चालत असतानाच पार पाडतात. मनुष्यप्राण्याप्रमाणे त्यात कोणतीही गुप्तता ते पाळत नाहीत .. त्यामुळे .. वालादोलिद पासून पुढच्या सगळ्या प्रवासात हत्तीच्या मागे चालता चालता सरदारापुढ्यातच कितीवेळा हा समारंभ आरंभला जाईल आणि हत्तीच्या खाण्यापिण्याच्या प्रमाणातच तो असल्यामुळे किती प्रमाणात तो असू शकेल याची जाणीव त्या नोकराला होती .. पण सरदाराचा आदेश आधीच सुटला होता त्यामुळे तो बदलण्याऐवजी आणखी काही माणसं नेमली गेली जी हत्ती आणि सरदाराच्या वाहनाच्या मधून चालत होती आणि अश्या प्रसंगी रस्ता सरदाराच्या चेहऱ्याइतका लख्ख करून टाकण्याची खऱ्या अर्थाने प्रचंड जबाबदारी झेलत होती. प्रवासाच्या सुरुवातीलाच पावसाने हजेरी लावली तर भारतातल्या मॉन्सूनला खऱ्या अर्थाने मुकत

असलेल्या सॉलोमन .. नाही नाही सुलेमान ला .. सरदाराने तादपत्रीने झाकायचे आदेश दिले. मग तीच माणसं दहा-पंधरा फूट वर असलेल्या फ्रिट्झच्या मदतीने ती प्रचंड ताडपत्री ओढताना दिसू लागली .. भारतात सोन्या-रुप्याने मढवलेल्या राजेशाही हत्तींनाही पावसापासून झाकायला कोणी राजाने ताडपत्री घातली नसेल असं बोलावं तर भारत लांब ठेवायचा आदेश आधीच सुटला होता .. सुलेमानला दुपारचे चार तास विश्रांती लागते हे सरदाराला वेळ घालवनारं वाटून फ्रिट्झला न विचारताच सुलेमानच्या विश्रांतीची वेळ अर्ध्याहून कमी केली गेली .. आदेशांकरता सुटणं हे एखादा साधा शब्द सुटण्याइतकंच सोप्पं असल्यामुळे हे सगळं असं होतं ..

२ : साधारण दोन-चार वेळाच सुलेमानच्या विधींचं दृष्य आणि वास सहन न होऊन त्या भल्या मोठ्या जथ्यामधली सरदाराच्या वाहनाची जागा बदलली गेली .. आता हत्ती सगळ्यात मागे ठेवला गेला .. फ्रिट्झला शिक्षा झाल्याप्रमाणे मागून मागून चालत यावं लागत असलं तरीही तो सगळ्यांच्या वर होता .. त्याची ती जागा मात्र कोणीही हिरावून घेऊ शकत नव्हतं .. पुढे या प्रवासात एकदा हत्तीवर घातलेल्या त्या ताडपत्रीमुळे तो विचित्र दिसत असून प्रथमदर्शनाने एरवी मोठा असला तरी लोभस वाटणारा सुलेमान अगदीच अजागळ आणि ओंगळ दिसतो आहे असं राणी मारिआ ला वाटू लागलं आणि ते तिने सरदाराला सांगितलं आणि ते तिने सांगितलं म्हणून त्याला पटलंही, तेव्हा ती ताडपत्री अखेर हत्तीवरून निघाली आणि पोहोचवली गेली वालादोलिदच्या चर्चमधे तिथल्या मांडवावर छप्पर म्हणून .. पावसाने घालवलेला प्रवासाचा वेळ भरून काढण्यासाठी हत्तीच्या विश्रांतीत कटौती करता येणार नाही हे ही हळू हळू पटत गेलं .. आणि तो प्रचंड जथा वालदोलिदकडून एका बंदराच्या दिशेने जाऊ लागला .. या बंदरात हत्तीला जहाजावर चढवून त्यातले बरेचसेजण परत येणार असं ठरलं होतं ..

३ : सी ऑफ रोजाज .. वालादोलिद पासून अनेकजण हेच पाहायला आले होते की कसा हा चार टनी प्राणी जहाजावर जाणार .. काही जणांच्या डोक्यात सर्कसमधे माणसांच्या विकृतपणाचे बळी झालेले लोखंडी गोळ्यावर स्वतःला सावरणारे हत्तीच होते .. पण हा हत्ती या आधीच समुद्रातून प्रवास करून आला आहे आणि आताचा समुद्र हा त्याच्या आधीच्या समुद्राच्या तुलनेत काहीच नाही हे ही काहींना माहित नव्हतं .. भारतातल्या चार वेदांमधे हत्तीबद्दल आणि त्याच्या अनेक उत्कृष्ट क्रीडांबद्दल सांगितलं आहे, जे शुभ्रो अर्रर्रर .. फ्रिट्झच्या मनात घट्ट असलं तरी ते बाजूला ठेवण्याचा आदेश होता .. त्यामुळे .. आता सगळं काही त्या हत्तीच्याच संयमावर आधारून होतं .. हत्तीचा संयम .. हो निदान भारतीय हत्ती तरी हे समजून असतात की मनुष्य नावाच्या प्राण्याबरोबर नांदायचं असेल तर आपल्याला एकच गुण महत्वाचा ठरतो आणि तो म्हणजे संयम ..नाहीतर स्वतःच्या स्वार्थासाठी हा प्राणी आपल्याला मारून टाकू शकतो, प्रसंगी आपले रुबाबदार दात विकून टाकू शकतो .. त्यामुळे हत्तीमधे ठायीठायी भरलेला असतो संयम त्या एका महात्म्याचा संयम जो म्हणाला होता "देवा त्यांना माफ कर कारण ते काय करताहेत हे त्यांनाच कळत नाही" आणि इथे या वाक्यातले 'ते' म्हणजे तुम्ही आम्ही आणि आपण होऊन बसलेले असतो .. आणि आपल्या समोर उरतो तो एक बुध्दिमान, समंजस आणि संयमी प्राणी .. हत्ती !

दृश्य ५

१ : सी ऑफ रोजाज् मधून आपला जहाजावरचा प्रवास संपवत आलेला सुलेमान जहाजावर व्यवस्थित उभा होता .. त्याला पाहिजे तेव्हढं खाद्य त्याच्या जवळ आणि बाकीचं लागू शकेल तेव्हढं सगळं खाद्य

जहाजातच खाली सामानाप्रमाणे ठेवलं होतं आणि त्यामुळेच त्या बैलगाड्या आता वालादोलिद ला परतल्या होत्या हे वेगळं सांगायची गरज नाही .. मधेच कधी मॅक्सिमिलियन त्याला पाहायची इच्छा व्यक्त करीत असे आणि माहूताला म्हणजे फ्रिट्झला किंवा शुभ्रो ला एखाद्या म्हाताऱ्या खलाश्याशी त्याचं चालू असलेलं आणि रंगलेलं भारतातल्या वेगवेगळ्या गोष्टींबद्दलचं एखादं संभाषण अर्धंच सोडून पळावं लागत असे हे पाहायला की सॉलोमन ऊर्फ सुलेमान आता नीट म्हणजे स्वच्छ जागेवर स्वच्छ अवस्थेतच आहे की नाही .. नसेल तर तिथेच असलेलं पाण्याचं पिंप उपडं करून सुलेमानच्या एखाद्या नवथर विधीचे अवशेष थेट समुद्रात घालवून सरदाराच्या डोळ्यांसाठी योग्य असा देखावा तो तिथे निर्माण करीत असे. तरीही आणि एरवीही कधी सरदार तिथे येताना आपला सुगंधी द्रव्याने भरलेला रुमाल मात्र जरूर आणत असे .. कारण देखावा जरी पाहायला त्रासदायक नसला तरीही त्या समुद्राच्या भन्नाट वाऱ्यालाही न जुमानणारा असा एक वास मात्र त्या जागी नक्की ठाण मांडून बसलेला असे ! जिनोवा शहराच्या धक्क्याला हे जहाज येऊन लागलं तेव्हा शहरवासियांनी ही तोबा गर्दी केली होती ..

२ : आपला लाडका सरदार मॅक्सिमिलियन आणि त्याची लाडकी राणी मारिआ दरम्यानच्या काळात तिला जहाजावरच झालेल्या दोन मुलांसह येत आहेत आणि त्यांच्या सोबत त्यांना भेट मिळालेला एक जिवंत हत्ती आहे हे बातमी भुरूभुरू पेटत्या सुरुंगाच्या दारूसारखी शहरात पसरून हा माणसांचा स्फोट त्या बंदरावर झाला होता. प्रथम जहाजातून घोडदळ उतरलं .. घोडी घसरू नयेत याची काळजी घेत ते खाली गेले .. मग सामानसुमान आणि मग होता सुलेमान ! प्रत्येकाला आकाशातून एखादा देवदूत उतरू लागला तर जसं वर पाहावं लागेल तसा प्रत्येकजण पाहू लागला .. एक एक पाऊल टाकत सुलेमान धक्क्याकडे निघाला तेव्हा त्याच्या पाठीवर बसलेला माहूत म्हणा किंवा शुभ्रो म्हणा किंवा फ्रिट्झ म्हणा लोकांना दिसला आणि लोकांनी एकच आवाज केला .. जहाजावरचा प्रवास संपताना आपल्याला कोणालाही न कळेल अश्या एखाद्या कारणामुळे तेव्हढ्यातच सुलेमान ने त्याचा एक सणसणीत चीत्कार एखाद्या स्वर्गीय अजस्त्र ट्रंपेट्च्या आवाजाप्रमाणे त्या शहराच्या हवेत दणदणवला ! त्यासाठी लोक तयार नव्हतेच .. काही पळून गेले, काही घाबरून पडले, काही गलितगात्र झाले मात्र काहींनी आणखी मोठा आवाज केला .. हे जयघोषपूर्ण स्वागत पाहून शुभ्रो ऊर्फ फ्रिट्झ ला खूप आनंद झाला .. त्याला वाटून गेलं .. हे डॉम झाओ, मॅक्सिमिलियन सार्खे राजे, सरदार आणि एक हत्तीच्या पाठीवर विराजमान झालेला माहूत यांच्यात काहीच फरक नाही !

३ : मग पुढे मॅक्सिमिलियन आणि बायकामुलांचं यथोचित स्वागत झाल्यावर आता नवा तांडा निघाला आल्प्सच्या दिशेने .. सरदार बुद्धीने तेज होता तशीच त्याची दूरदृष्टीही वाखाणण्याजोगीच होती .. मधे तयार कपड्यांच्या दुकानांपाशी थांबत थांबत त्याने त्याच्या रथापुढचे वीस स्वार, बैलगाडीवाले, त्याच्या रथातली मंडळी, फ्रिट्झ, आणि त्याच्या मागे येणारे आणखी तीस स्वार यांच्याकरता ऊबदार कोट विकत घेतले .. इतके सारे स्वार हा कोणत्याही पद्धतीच्या हल्ल्यापासून बचावाचा आणि इतके सारे कोट हा अचानक उद्भवणाऱ्या पावसाचा नि वादळांचा बंदोबस्त होता .. शहर सोडताच आलेल्या पावसाने मात्र वालादोलिदमधे काढून टाकलेल्या हत्तीवरच्या ताडपत्रीची आठवण फ्रिट्झ ला करून दिली ..

१ : मधल्या सगळ्या प्रवासाचं वर्णन त्या काळातच उद्भवलेल्या एका फ्रेंच म्हणी सारखं करता येईल .. इंग्रजी मधे मग हीच म्हण नो न्यूज इज गुड न्यूज म्हणून रूढ झाली .. या प्रवासात पिआचेन्झा, मांटुआ, प्रसिद्ध रोमिओ जुलियेटचं व्हेरोना आणि पादुआ ला ही यात्रा येऊन पोहोचली. बासिलिका ऑफ सेंट अन्थोनी साठी प्रसिद्ध असलेल्या या शहरात मुक्काम होता. सरदार आणि मारिआ जवळच्या एका शाही पाहुणचारासाठी गेलेली असताना सकाळी बासिलिकामधून एक धर्मगुरू हत्तीवरच्या माणसाला भेटायला तिथे आला.

२ :  हत्तीवरला माणूस म्हणजे माहूत .. किंवा फ्रिट्झ तेव्हा झोपला होता ..  आणि सुलेमानही त्याच्या आकारापेक्षा मोठ्या आकाराच्या मॉर्फियस च्या कुशीत झोपला होता ..

३ :  हत्तीवरच्या माणसाकडे धर्माचं काम होतं .. जे धर्मगुरू त्याच्याकडे प्रस्तावाच्या रूपात घेऊन आला होता .. प्राथमिक चर्चेत धर्मगुरूला एक कोडं पडू लागलं की बाप्तिस्मा झालेला असूनही ख्रिश्चन नसलेला असा कसा हा फ्रिट्झ .. पण पोर्तुगलमधल्या शुभ्रोपेक्षा उत्क्रांत होऊन व्यावहारिक शहाणपण मिळवलेल्या फ्रिट्झ ने घोळ जास्त वाढू न देता कामाच्या मुद्द्याला हात घातला .. सुलेमान शांतपणे झोपला होता आणि धर्मगुरूंनी कचरत प्रस्ताव मांडला ..

१ :  त्याच दिवशी दुपारी त्या सुलेमान हत्तीने बासिलिकाच्या दारासमोर जाऊन दोन्ही गुडघे टेकायचे .. आणि हत्तीने बासिलिकासमोर गुडघे टेकल्याचा चमत्कार काही साक्षीदारांसमोर घडवून अधर्म वाढत चाललेल्या या जगात पुन्हा लोकांना चमत्काराच्या मार्गाने धर्माकडे वळवण्याच्या त्यांच्या प्रयत्नात माहूताने त्यांना साथ द्यायची असा एकंदरीत हा प्रस्ताव होता ..

२ :  हत्ती झोपायला खाली बसतो तेव्हा तो आधी एक आणि नंतर एक असे गुडघे टेकवूनच खाली बसतो .. पण आपल्याला झोपायला आपण जे करतो ते करायचंय पण झोपायचं नाही आहे .. आधीच थांबून, गुडघ्यांवरच उभं राहायचं आहे हे हत्तीला कसं सांगावं हे शुभ्रोला-फ्रिट्झला कळेना .. शिवाय हे नाही जमलं तर धर्मगुरू त्याचा अर्थ फ्रिट्झने ते जमू दिलं नाही असा घेण्याचा धोका होताच .. आपण ज्याला हो म्हणून बसलो आहे तो आपल्या जीवावरचा खेळ होऊ शकतो याची जाणीव धर्मगुरू गेल्यावर झाल्याने हत्तीकडून हे करून घेणं हा एकच पर्याय आता उरला होता ..

१ :  मग ठीक माध्यान्ही चर्चच्या दारात हत्ती नेईपर्यंत शुभ्रो आपल्या जीविताची काळजी घेण्याची तयारी करत राहिला .. मधेच त्याने हत्तीला हे हिंदी-बंगालीत ओरडून सांगायचा प्रयत्नही केला की अरे बाबा माझ्या जिवाचा सवाल आहे .. काहीही कर पण हे एक काम तू आता करच .. माध्यान्ही हत्ती वचनाप्रमाणे चर्चच्या दारासमोर उभा होता .. अनेकजण साक्षीदार तिथे हजर होतेच .. थोड्या वेळाने शुभ्रोने आपल्या पायाने हत्तीच्या उजव्या कानापाशी जरासं खाजवल्यासारखं करताच ते भारतातून निघून लिस्बन मार्गे तिथे पोहोचलेलं सॉलोमन ऊर्फ सुलेमान नावाचं तीन मीटर उंचीचं अजस्र शरीर गुडघ्यांवर खाली आलं .. पाहणाऱ्यांनी हा चमत्कार सेंट अॅन्थनी यांच्या खात्यात जमा केला आणि चर्चला प्रोटेस्टंट पंथाच्या आव्हानाविरुद्धचा उन्नतीचा मार्ग खुला करून दिला ..

२ :  या यात्रेचा पुढला मार्ग मात्र आता व्हेनीस शहरानंतरच्या आल्प्सकडे जाणाऱ्या चढणीमुळे आणखी खडतर होत जाणार होता ..

(अंधार)

दृश्य ६

१ :  आल्प्स पर्वत .. महाकाय .. त्यांचं अस्तित्वच पुरेसं असे ते पर्वत .. सर्वात महत्वाचा भाग .. या यात्रेचा .. हाच .. आल्प्स पर्वतातला .. तीव्र चढ आणि तो चढायला लागतानाच सुरू झालेली हिमवृष्टी ..

२ :  गोव्याहून पोर्तुगलदेशी आल्यापासून फक्त एकदाच हिमवृष्टी अनुभवाला आली होती त्यामुळे फ्रिट्झ, म्हणजे त्या हिमवृष्टीच्या वेळचा शुभ्रो या सगळ्याशी विशेष परिचित नव्हता ...

१ :  त्यात सरदार आणि त्याची बायको असलेलं वाहन आता पुढे गेलं होतं कारणं दोन .. हत्तीला जेव्हढा वेळ लागेल तेव्हढा वेळ सगळ्या जथ्थ्याने हळूहळू चालत वेळ घालवण्यात काहीच मतलब नव्हता .. त्यापेक्षा जेव्हढ्यांना जमेल तेव्हढ्यांनी सुरक्षित ठिकाणी पोहोचण्यावर नियोजनाचा भर होता .. आणि त्यातच दुसरं म्हणजे हां हां म्हणता वाढत चाललेला हिमवर्षाव ..
२ :  शुभ्रोला हत्तीची खूपच काळजी वाटू लागली आणि हिमवर्षाव वाढू लागला. सरदाराच्या गाडीमागे चालण्याची सवय झालेल्या माहूताला आता पुढे कोणी नाही याचं चुकल्याचुकल्यासारखं आणि मागेही जवळपास कोणी नाही याचं भय वाटू लागलं होतं .. भुरूभुरू पडून हळूहळू जमू लागलेल्या त्या हिमाने सगळीकडे सगळं पांढरं करून टाकलं होतं .. झाडं, रस्ते आणि घरं थिजून त्या पांढऱ्या थराआड लपून जाऊ लागली होती .. सगळीकडे फक्त पांढरा रंग आणि त्याच्या अलिकडे, पलिकडे काहीच नाही .. आणि असलं तर काही दिसणं शक्य नाही .. आपण जिठून चालतो आहोत ती एखादी थिजलेली नदी असेल तर केव्हा तिच्यावरचा बर्फ फुटून घात होईल सांगता येत नाही .. थांबून राहायला आसरा नाही .. समोर दिसत असलेल्या रस्त्यापुरतंच सीमित जग .. या सगळ्यातून भांबावलेला शुभ्रो अचानक भानावर आला .. आतापर्यंत हत्तीच्या केसांमधे आणि त्वचेवरच्या चिरांसारख्या रेघांमधे हिमकण साठू लागले होते .. ते हात बाहेर काढून स्वतःच्या बोटांनी काढून टाकणं भाग होतं .. ते करताना बोटं थिजून जात होती .. जेव्हढं हिम काढून टाकावं त्याच्या दुप्पट परत जमा .. एकदा मागून येणारी खाद्याची गाडी दिसते का ते पाहायला तो वळला तर हत्तीच्या पाठीवर एक बर्फाची लादी तयार झालेली .. हत्तीच्या शरीरातल्या ऊष्णतेमुळे ही काही फार घट्ट नसेल हा त्याचा विचार मात्र फोल ठरला .. कशी बशी त्याने ती लादी फोडली .. बंडखोर हिमाला तो हत्तीच्या केसांमधून त्वचेवरून हाकलत राहिला आणि हळूहळू आकाशालाही बहुधा हेच हवं होतं त्यामुळे आकाशातून अविरत पडणारी कापसाची धार थांबली ..

१ :  जरा वेळाने ती चढण संपल्याची चिन्हं दिसू लागली .. हत्तीने जरा मोकळा श्वास घ्यायला सुरूवात केली आणि समोरच्या पठारावर बरीच माणसं जमलेली दिसू लागली .. ही जत्रा कोणाची हा प्रश्न थोड्या वेळातच सुटला कारण अंतर कमी होताच आणि वृष्टी थांबत जाताच हा आपला जथ्थाच आहे आणि मॅक्सिमिलियनच्या गाडीच्या चाकाचा आस तुटल्यामुळे सगळे थांबले आहेत हे कळलं ..

२ :  घनघोर हिमाच्या माऱ्यातून सुलेमानला बाहेर आणण्याच्या प्रकाराला चमत्कार म्हणता येईल हवं तर .. पण आकाशाने केलेल्या या चमत्कारामुळे, फ्रिट्झने केलेल्या बनावट चमत्काराच्या खबरींमुळे चिडलेला मॅक्सिमिलियन मात्र शांत झाला हे नक्की !

१ :  पुढे ऑस्ट्रियाच्या भागातल्या आल्प्स मधे खरं आव्हान होतं ते दोन खिंडींचं .. त्यातली एक कशीबशी पार झाली आणि दुसऱ्या खिंडीत बर्फाचा दोंगर खचू लागल्याचा भास होऊ लागला .. आता खिंडीत कोंडी आणि मागून जर बर्फाचा डोंगर गडगडत येऊ लागला तर .. अश्यावेळी माहुताने हत्तीला चालतच राहाण्याची खूण केली .. चालत राहा .. चालत राहा .. एखाद्याने धावण्याची खूण केली असती तर ..लवकर पोहोचला असता का सुलेमान त्या धोक्यातून बाहेर माहित नाही .. पण चालत राहा चालत राहा च्या खुणांमधे काहीतरी हत्तीच्या जाणिवांमधून आत शिरत होतं .. अचानक काहीतरी झालं आणि हत्ती अड्खळला .. आणि स्वतःचा पुढल्या पायांच्या गुड्घ्यावर खाली गेला .. पायांतलं बळ संपल्यामुळे ते तसं

झालं होतं .. यावेळी कोणाला खोटा चमत्कार दाखवण्याच्या जबाबदारीतून नाही .. शुभ्रोचं सुदैव की हत्ती जेव्हा जमिनीवर आला तेव्हा तो हवेत फेकला गेला नाही .. नाहीतर काय घडलं असतं कोणास ठाऊक ..

२ : शुभ्रोने हत्तीच्या मानेवरचे काही केस पकडून ठेवले होते, तेच केस जे अद्भूत सूप करून पिण्यासाठी युरपमधले लोक मागतात आणि फ्रिट्झ त्यांना ते विकून पैसे कमावतो असा आरोप त्याच्यावर केला गेला होता .. वेगवेगळ्या खाणाखुणा, काठीने ढोसत, टोचत सुलेमानला पुन्हा उभं करणं गरजेचं होतं ..

१ : सुलेमान शेवटी उभा राहिला .. या कहाणीत माहूत म्हणून शुभ्रो नसता तर काय झालं असतं असच सुलेमान्लाही वाटून गेलं .. पण हत्तींना बोलायचं किंवा शांत राहायचं असे पर्याय उपलब्ध झाले तर हत्ती नेहेमी शांतच राहातात .. शांतपणे आपलए आपलं जगत राहातात ..
२ : आणि माहूत त्यांच्याशी नातं बांधून असतात .. असं नातं जे आधाराचं असतं, एकमेकांना मान देण्याचं असतं .. एक्मेकांकडे खूप गुपितं आहेत हे माहित असूनही ती सगळी जाणून घेण्याची अहमहमिका नसलेलं हे नातं ..

१ : हे नातं असलं तर पायाखालून किती अंतर निघून गेलं काही भान राहात नाही

२ : हे नातं असलं की डोक्या-तोंडावर ऊन-वारा-पावसाचा आणि फ्रिट्झसारख्याच्या बाबतीत हिमाचा किती मारा झाला ह्याचं भान राहात नाही ..

१ : कोणताही प्रवास जादुईपणे पार पडतो ..

२ : आणि तो जर हत्तीने केलेला असेल तर नक्कीच ..

१ : कारण एका हत्तीच्या आतही असंख्य गुपितं दडलेली असतात

(अंधार)

दृश्य ७

३ : असंख्य अडचणींना तोंड देत आल्प्सच्या पर्वतराजीतून एक भारतीय हत्ती विएन्नाच्या वेशीवर येऊन पोहोचला होता .. त्याच्या पाठीवर त्याचा माहूत .. त्याचा जिवलग. वेगवेगळी माणसं आपल्या राजाच्या स्वागतासाठी आणि हत्ती हा प्रकार काय ते पाहण्यासाठी साहजिकच जमली होती .. आपल्या राजाला अश्या प्रसंगी आपले नृत्याविष्कार लोक का दाखवत असावेत हे अजूनही कोणालाही पडेल असं कोडं आहेच .. पण .. त्या ठिकाणी खूप म्हणजे खूपच लोक जमले होते .. आणि त्या वेळच्या त्या गर्दीतून आपल्या आईचा हात धरून तिथे आलेली एक केवळ पाच वर्षांची चिमुरडी त्या गर्दीतून आईचा हात सोडून हत्तीच्या दिशेला पळत गेली .. हत्तीच्या चार टन वजनी शरीराचा भार आता तिच्या अंगावर पडल्याशिवाय राहाणार नव्हता .. हत्तीचा पाय तिच्या थेट जवळ आला .. तेव्हाच हत्ती .. आपला सॉलोमन ऊर्फ सुलेमान थबकला. त्याने आपली सोंड त्या मुलीभोवती गुंडाळली .. जणू काही एखाद्या आप्तेष्टाने मारलेली मिठीच .. दरम्यान सरदार मॅक्सिमिलियनच्या कानावर ही वार्ता गेली तो ही तिथे धावत आला .. आपल्याला भेट मिळालेल्या सुलेमान ने आपल्या नगरीत इत्का खडतर प्रवास करून आल्यावर एखादा असा अपशकून

करणं हे त्याला अजिबातच चालू शकणार नव्हतं .. पण तेव्हढ्यात हत्तीने त्या मुलीला सोंडेत धरून वर एखाद्या निशाणासारखं फडकवत परत खाली आणलं .. आणि अलगद तिच्या आईच्या हातात दिलं .. लोकांनी जल्लोश केला .. हत्तीने आयुष्याच्या चालूच राहाण्याचं जे निशाण नुकतंच फडकवलं होतं .. त्याचा जयजयकार झाला .. मॅक्सिमिलियन आणि त्याच्या पुढल्या मुलांसाठी पुन्हा गरोदर झालेली त्याची मारिआ हे ही सुलेमानला अभिवादन करण्यासाठी वाकले ..

हत्तीची ही यात्रा पूर्ण झाली.

आणि मग ..या दिवसापासून दोन वर्षांच्या आतच सुलेमान ऊर्फ सॉलोमन हत्ती पुढल्या यात्रेसाठी इथून कायमचा निघून गेला ..शुभ्रो ऊर्फ फ्रिट्झ कुठे गेला याबद्दल कोणालाच काहीही माहित नाही.

**(समाप्त)**